

रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक २०१
www.ramprahar.com
गुरुवार, ६ फेब्रुवारी २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## हर हर गंगे! पंतप्रधान मोदींचे त्रिवेणी संगमावर पवित्र स्नान

**प्रयागराज :** महाकुंभमेळ्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी बुधवारी (दि.५) सहभागी झाले. त्यांनी इथल्या त्रिवेणी संगमावर पवित्र स्नान आणि पूजा केली. या वेळी पंतप्रधान मोदी यांनी भगवे वस्त्र परिधान केले होते. त्यांच्या गळ्यात आणि हातात रुद्राक्षाची माळ होती. त्यांनी मंत्रोच्चारात संगमात आस्थेची डुबकी घेतली. त्यानंतर त्यांनी गंगापूजन केले. महाकुंभात प्रयागराज येथील पवित्र संगमात स्नान केल्यानंतर मला पूजा करण्याचे परम भाग्य लाभले. मां गंगेचा आशीर्वाद मिळाल्याने मनाला अपार शांती आणि समाधान मिळाले. या वेळी सर्व देशवासीयांच्या सुख, समृद्धी, आरोग्य आणि कल्याणासाठी प्रार्थना केली. हर हर गंगे! अशी भावना पंतप्रधान मोदी यांनी एक्स वरील पोस्टमधून व्यक्त केली आहे.

# मराठवाड्याची पुढची पिढी दुष्काळ पाहणार नाही -मुख्यमंत्री फडणवीस

**बीड : प्रतिनिधी**

मराठवाड्याची पुढची पिढी दुष्काळ पाहणार नाही, असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी (दि.५) बीडमध्ये एका सभेत दिले. बीडच्या आष्टी मतदारसंघातील आष्टी उपसा सिंचन योजना क्र.३ अंतर्गत येणाऱ्या शिंपोरा ते खुंटेफळ पाईपलाईन कामाचा मुख्यमंत्र्यांनी आढावा घेतला, यासोबतच इतर विकासकामांचेही भूमिपूजन केले. या वेळी त्यांनी बीडमधील मस्सजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील प्रत्येकावर कारवाई होणार, असा शब्दही दिला.



सध्या संतोष देशमुख प्रकरणातील सात आरोपींवर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली असून ते सध्या तुरुंगात आहेत. यातच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी बीडमधील व्यासपीठावरून संतोष देशमुख हत्या प्रकरणावर भाष्य केले आहे.

ते म्हणाले की, स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या खुनाची घटना अतिशय दुर्दैवी आहे. या हत्येसारख्या घटना खपवून घेतल्या जाणार नाहीत. याप्रकरणी मग कोणीही असो प्रत्येकावर कारवाई केली जाईल, असा विश्वास मी तुम्हाला देतो.

फडणवीस पुढे म्हणाले, २०१४ साली पहिल्या कार्यकाळात

### 'संतोष देशमुखांच्या मारेकऱ्यांवर कारवाई होणारच'

कृष्णा खोऱ्यातील मराठवाड्याच्या हक्काच्या २३ टीएमसी पाण्याची फाईल जेव्हा समोर आली, तेव्हा यातील केवळ ७ टीएमसी पाणी वापरासाठी उपलब्ध होते. त्यानंतर, या योजनेचा सातत्याने पाठपुरावा करत, निधी देत, यासंदर्भात काम सुरू करण्यात आले. तसेच २०२२ साली पुन्हा एकदा सरकार आल्यांनतर, जलसंपदा विभागाची जबाबदारी असताना, सर्वात पहिली सुधारित प्रशासकीय मान्यता देत, तब्बल ११ हजार कोटी निधी कृष्णा-मराठवाडा उपसा सिंचन योजनेला उपलब्ध करून देण्यात आला. या योजनेमुळे बीड जिल्ह्यातील व परिसरातील दुष्काळ हा भूतकाळ होणार असल्याचा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

शेतकरी बांधवांसाठी राज्यात सुरू असलेल्या वीज सवलत व सिंचनाच्या इतर सर्व योजनांची सविस्तर माहितीही मुख्यमंत्र्यांनी दिली. तसेच निविदा प्रक्रियेच्या अंतिम टप्प्यात असलेल्या नदीजोड प्रकल्पाचे काम सुरू करून, समुद्रात वाहून जाणारे ५३ टीएमसी पाणी मराठवाड्यात आणून, विभागाच्या कानाकोपऱ्यात पोहचवणार असल्याचेही, मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.



### सर्वाधिक भाजप सदस्य नोंदणी

## आमदार प्रशांत ठाकूर यांचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सन्मान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुंबई येथे झालेल्या भाजप संघटन पर्व प्रदेश प्रशिक्षण कार्यशाळेत महाराष्ट्रातील सर्वाधिक सदस्य नोंदणी करणाऱ्या विधानसभा मतदारसंघातील लोकप्रतिनिधींचा सन्मान करण्यात आला. त्यानुसार पनवेल विधानसभेला देण्यात आलेले उद्दिष्ट पूर्ण केल्याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आमदार प्रशांत ठाकूर यांचा सत्कार करण्यात आला.

शिर्डीतील भाजप प्रदेशचा मेळाव्यामध्ये केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी सदस्य नोंदणीचे उद्दिष्ट जाहीर केले होते. त्यानुसार पनवेल विधानसभा संघासाठी एक लाख १४८०० सदस्य नोंदणीचे उद्दिष्ट देण्यात आले होते. पनवेल विधानसभा मतदार संघात आमदार प्रशांत ठाकूर व जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या नेतृत्वाखाली हे उद्दिष्ट पार करत एक लाख ३० हजार सदस्य नोंदणी झाली आहे. त्याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या वेळी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण, राष्ट्रीय सह संघटन मंत्री शिवप्रकाश शर्मा, मंत्री पंकजा मुंडे, मंत्री चंद्रकांत पाटील, माजी विधान परिषद विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर यांच्यासह राज्यातील आमदार, पदाधिकारी, जिल्हाध्यक्ष उपस्थित होते. पनवेल विधानसभा मतदार संघात सदस्यता नोंदणी अभियानासाठी पुढाकार घेणाऱ्या सर्वांचे हे यश असल्याचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी म्हटले असून त्यांनी सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत.

## कळंबोलीत रंगणार कुस्त्यांचा आखाडा

### विजेत्याला पाच लाख रुपये व मानाची गदा

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी भारतीय जनता युवा मोर्चा पनवेलतर्फे पनवेल विधानसभा मतदार संघात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल महापालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली ६ ते ९ फेब्रुवारीपर्यंत भव्य क्रीडा महोत्सव अर्थात नमो चषक २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. त्या अंतर्गत रविवार दिनांक ०९ फेब्रुवारी रोजी कळंबोलीमधील सेक्टर १६ येथे भव्य कुस्ती स्पर्धा होणार आहे.



या स्पर्धेत रुस्तम ए हिंद पै. सिकंदर शेख (सोलापूर) विरुद्ध रुस्तम ए हिंद लाली गुरुदास पोल (पंजाब) यांचा सामना होणार असून यामधील विजेत्या पैलवानास पाच लाख रुपये व मानाची गदा, तर महिलांच्या गटात महाराष्ट्र चॅम्पियन पै. अमेधा घरत (पनवेल) विरुद्ध महाराष्ट्र चॅम्पियन पै. अंकिता फातले (कोल्हापूर) यांचा खास आकर्षण सामना होणार असून विजेत्या पैलवानाला ५१ हजार रुपये व मानाची गदा देऊन गौरविण्यात येणार आहे. **(पान २ वर..)**

## संत तुकोबांच्या वंशजाची आत्महत्या



**पिंपरी : प्रतिनिधी**

देहूत संत तुकाराम महाराजांचे अकरावे वंशज ह.भ.प शिरीष महाराज मोरे यांनी आत्महत्या केली आहे. आर्थिक विवंचनेतून आत्महत्या केल्याचा अंदाज आहे. या घटनेमुळे देहू गावावर शोककळा पसरली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शिरीष महाराज यांनी बुधवारी (दि.५) सकाळी साडेआठच्या सुमारास राहत्या घरी उपरण्याने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. आर्थिक विवंचनेतून ही आत्महत्या झाल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. २० फेब्रुवारीला त्यांचा विवाह होणार होता. मोरे यांनी पंख्याच्या हुकाला उपरण्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे निदर्शनास आले. आत्महत्या करण्यापूर्वी त्यांनी चिट्ठी लिहून ठेवली आहे. देहूरोडचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विक्रम बनसोडे यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक तपास सुरू आहे.

## मंत्री आशिष शेलार भाजपचे रायगड जिल्हा संपर्क मंत्री



**मुंबई :** भाजप महाराष्ट्र प्रदेशच्या वतीने राज्य सरकारमधील मंत्र्यांची जिल्हा संपर्क मंत्रीपदी नियुक्ती करण्यात आली आहे. राज्यभरात १७ जिल्ह्यांमध्ये भाजपने संपर्क मंत्र्यांची नियुक्ती केली आहे. गोंदिया जिल्ह्याच्या संपर्क मंत्रीपदी डॉ. पंकज भोयर, बुलढाणा आकाश फुंडकर, यवतमाळ अशोक उईके, वाशीम राधाकृष्ण विखे पाटील, छत्रपती संभाजीनगर अतुल सावे, बीड पंकजा मुंडे, धाराशिव जयकुमार गोरे, हिंगोली मेघना बोर्डीकर, जळगाव गिरीश महाजन, नंदुरबार जयकुमार रावल, मुंबई शहर जिल्हा मंगलप्रभात लोढा, ठाणे गणेश नाईक, रायगड आशिष शेलार, रत्नागिरी नितेश राणे, सातारा शिवेंद्रराजे भोसले, कोल्हापूर माधुरी मिसाळ आणि पुणे जिल्ह्यात चंद्रकांत पाटील यांची संपर्क मंत्री म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

## निवडक

### विधानसभा निवडणुकीसाठी दिल्लीत ५७.७ टक्के मतदान

**नवी दिल्ली :** दिल्ली विधानसभेच्या ७० जागांसाठी बुधवारी (दि.५) मतदान झाले. सायंकाळी ५ वाजेपर्यंत ५७.७० टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावल्याचे केंद्रीय निवडणूक आयोगाने जाहीर केले. विधानसभा निवडणुकीसाठी शांततापूर्ण आणि निर्भय वातावरणात मतदान झाले असल्याचे निवडणूक आयोगाने म्हटले आहे.

### ट्रम्पकडून अमेरिकेतील अवैध भारतीयांची स्वगृही रवानगी

**न्युयॉर्क :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अवैध स्थलांतरितांवर केलेल्या कारवाईमुळे अमेरिकेत राहणाऱ्या अवैध भारतीयांना स्वगृही पाठविले. अमेरिकेचे लष्करी विमान भारतीय स्थलांतरितांना घेऊन बुधवारी भारतात पोहचले. या वेळी पोलीस आणि प्रशासन तैनात होते.

## राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत पनवेलच्या पार्थ मानेला 'सुवर्ण'



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या पनवेल येथील महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात बारावी विज्ञान शाखेत शिकत असलेल्या पार्थ राकेश माने याने नुकत्याच उत्तराखंड येथे पार पडलेल्या ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत १० मीटर एअर रायफल प्रकारात सुवर्णपदकाला गवसणी घातली आहे.

पार्थच्या या यशाबद्दल 'रयत'चे चेअरमन चंद्रकांत दळवी, सचिव विकास देशमुख, महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी मंडळाचे अध्यक्ष परेश ठाकूर तसेच शिवछत्रपती पुरस्कार विजेते सूर्यकांत ठाकूर व संजय कदू आदी मान्यवरांनी विशेष कौतुक केले. **(पान २ वर..)**

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पाठपुराव्याने भोकरपाडा येथे साकारणार अंगणवाडी

### भाजप नेते अरुणशेठ भगत यांच्या हस्ते कामाचा शुभारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील भोकरपाडा येथे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पाठपुराव्यामुळे अंगणवाडीसाठी निधीमंजूर झाला असून या कामाचे भूमिपूजन भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते बुधवारी (दि.५) झाले.

पनवेल विधानसभा मतदार संघामध्ये आमदार प्रशांत ठाकूर यांच्या सक्षम नेतृत्वाखाली अनेक विकासकामे मार्गी लागत आहेत. त्यानुसार त्यांच्या पाठपुराव्यामुळे भोकरपाडा येथे अंगणवाडी बांधण्यासाठी ११ लाख २५ हजार रुपयांचा निधीमंजूर झाला आहे. या कामाचे भूमिपूजन भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्याहस्ते झाले.



या वेळी भाजपचे नेरे जिल्हा परिषद अध्यक्ष सुनील पाटील, शिवकर ग्रामपंचायतीचे सरपंच आनंद ढवळे, युवा मोर्चा तालुका सरचिटणीस विश्वजीत पाटील, बोनशेतचे माजी उपसरपंच मुकेश फडके, ग्रामविकास अधिकारी जनार्दन सरडे, भास्कर फुलोरे, कल्पेश फुलोरे, गोटीराम फुलोरे, हनुमान फुलोरे, रूपेश फुलोरे, किशोर फुलोरे, दीपक फुलोरे, हरिचंद्र फुलोरे, जोमा गोपाल फुलोरे, हिमालय गायकर, गजानन फुलोरे, विजय बळीराम फुलोरे, निकेतन फुलोरे, अभिजित फुलोरे, अनिकेत फुलोरे, राजेंद्र पाटील आदी उपस्थित होते.

## 'दहशतवाद्यांना उखडून टाका'

**दिल्ली :** केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांनी बुधवारी (दि.५) दिल्लीत जम्मू-काश्मीरमधील सुरक्षा परिस्थितीबाबत उच्चस्तरीय आढावा बैठक घेतली. घुसखोरी पूर्णपणे संपुष्टात यावी यासाठी गृहमंत्र्यांनी सर्व सुरक्षा यंत्रणांना जम्मू-काश्मीरमधील दहशतवादाविरुद्धचा लढा अधिक तीव्र करण्याचे निर्देश दिले. पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकार जम्मू-काश्मीरमधून दहशतवाद पूर्णपणे नष्ट करण्यासाठी कटिबद्ध असल्याचे ना. शाह या वेळी म्हणाले.

या बैठकीत जम्मू-काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा, केंद्रीय गृहसचिव, इंटेलिजन्स ब्युरोचे संचालक, जम्मू-काश्मीरचे मुख्य सचिव आणि पोलिस महासंचालकांसह गृह मंत्रालय आणि जम्मू-काश्मीर प्रशासनाचे वरिष्ठ अधिकारी सहभागी झाले होते. मोदी सरकारच्या सततच्या प्रयत्नांमुळे जम्मू-काश्मीरमधील दहशतवादाची परिसंस्था कमकुवत झाली असल्याचे गृहमंत्री शाह या वेळी म्हणाले.



# पर्यावरणविषयक समस्यांकडे दुर्लक्ष करणाऱ्या काही सिडको अधिकाऱ्यांवर वनमंत्र्यांची टीका

**नवी मुंबई : बातमीदार**

शहरातील पाणथळ जागा आणि खारफुटींचे संरक्षण करण्याचे आश्वासन देत, राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी पर्यावरणविषयक समस्यांकडे दुर्लक्ष करणाऱ्या काही सिडको अधिकाऱ्यांवर कडक टीका केली.

जनता दरबारात पर्यावरणवाद्यांच्या शिष्टमंडळाशी बोलताना नाईक म्हणाले की, डीपीएस फ्लेमिंगो तलावासारख्या महत्त्वाच्या पाणथळ जागा संरक्षित करण्याच्या नागरिकांच्या मागणीकडे सिडको सतत दुर्लक्ष करत आहे याची त्यांना जाणीव आहे.

वनमंत्री म्हणून पाणथळ जागा आणि खारफुटींचे संरक्षण करणे माझे कर्तव्य आहे आणि मी त्यांचा नाश करण्याचा कोणताही प्रयत्न होऊ देणार नाही, असे त्यांनी सांगितले आणि वाशी येथील विष्णुदास भावे सभागृहात जनतेशी संवाद साधताना उपस्थित असलेल्या वन विभागाच्या अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.



लेखक जयंत हुदार, नॅटकनेक्ट फाउंडेशनचे संचालक बी.एन. कुमार, नवी मुंबई पर्यावरण संरक्षण सोसायटीचे संदीप सरीन खारघर पाणथळ जागा आणि हिल्स फोरमच्या संयोजक ज्योती नाडकर्णी यांचा समावेश असलेल्या शिष्टमंडळाने नाईक यांना निवेदन सादर केले.

उच्चस्तरीय सरकारी समितीने जलवाहिन्या उघड्या ठेवण्याची शिफारस केली असतानाही, भरती–ओहोटीच्या पाण्याचा प्रवाह रोखून डीपीएस फ्लेमिंगो तलावाच्या नाशाच्या विरोधात त्यांनी तक्रार केली.

राज्याचे पर्यावरण संचालक आणि अतिरिक्त प्रधान मुख्य वनसंरक्षक यांनीही सिडकोच्या उच्च अधिकाऱ्यांना पत्र लिहून तलावातील साचलेले, प्रदूषित पाणी तपासण्यासाठी पत्र लिहिले आहे.

मी त्या ठिकाणी भेट दिली असल्याने डीपीएस तलावातील परिस्थितीची मला जाणीव आहे, असे नाईक म्हणाले आणि सिडको अधिकाऱ्यांवर संताप व्यक्त केला. मंत्री गणेश नाईक यांनी हा मुद्दा प्राधान्याने उचलण्याचे आश्वासन दिले. पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी आणि न्यायालये आणि राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण (एनजीटी) मध्ये दाद मागण्यासाठी नागरिकांच्या धाडसाचे कौतुक केले.


सीवुड्स एनआरआय कॉम्प्लेक्सला लागून असलेल्या कोस्टल रेग्युलेशन झोन–प्रधान भूखंडाचा लिलाव करण्याचा प्रयत्न सिडको करत असल्याचे शिष्टमंडळाने निदर्शनास आणून दिले तेव्हा नाई म्हणाले की, ते खारफुटी आणि पाणथळ जागांना कोणताही धोका सहन करणार नाहीत.

खारघर–तुर्भे लिंक रोडसाठी बोगदा खोदल्यामुळे पांडवकडा टेकड्यांकडे जैवविविधतेला धोका निर्माण झाल्याच्या चिंतेवर ते म्हणाले की, पायाभूत सुविधांचा विकास देखील महत्त्वाचा आहे. तथापि, जैवविविधतेवर परिणाम होऊ नये यावर त्यांनी सहमती दर्शविली.

पर्यावरणीय मुद्द्यांवर तपशीलवार चर्चा करण्यासाठी मंत्र्यांनी शिष्टमंडळाला पुन्हा भेटण्यास सहमती दर्शविली.

# ११ फेब्रुवारीपासून बारावी तर, २१ पासून दहावीची परीक्षा

## गैरप्रकार घडल्यास अजामीनपात्र गुन्हा दाखल होणार



**रायगड,: रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात येणारी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२ वी) ११ फेब्रुवारी ते १८ मार्च व माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१० वी) २१ फेब्रुवारी ते १७ मार्च कालावधीत आयोजित करण्यात आली आहे. कोणत्याही परीक्षा केंद्रांवर गैरप्रकार घडल्यास गैरप्रकारांना उद्युक्त करणारे, मदत करणारे व प्रत्यक्ष गैरमार्ग करणाऱ्यांवर दखलपात्र व अजामीनपात्र गुन्हा दाखल करण्यात येईल, असा इशारा राज्य मंडळाच्या सचिव डॉ. माधुरी सावरकर यांनी दिला आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी–मार्च २०२५ वी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (बारावी) परीक्षा दि. ११/०२/२०२५ ते दि. १८/०३/२०२५ व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (दहावी) परीक्षा २१/०२/२०२५ते दि. १७/०३/२०२५ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या आहेत. मुख्यमंत्री महोदयांच्या १०० दिवसांचा कृती आराखडा कार्यक्रमांतर्गत शिक्षणमंत्री महोदयांच्या मार्गदर्शनाखाली बारावी व दहावीच्या परीक्षा कॉपीमुक्त,भयमुक्त व निकोप वातावरणामध्ये सुरळीत पार पडाव्यात यासाठी महाराष्ट्र शासन व मंडळ प्रयत्नशील आहे. यासंदर्भात मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली व शालेय शिक्षण व क्रीडा विभाग प्रधान सचिव आणि शिक्षण आयुक्तांच्या उपस्थितीत राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, सर्व पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षक व मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दूरचित्र प्रणालीव्दारे बैठक घेण्यात आली.

या दूरचित्र प्रणालीमध्ये मुख्य सचिव यांनी यावर्षी होणाऱ्या बारावी व दहावी परीक्षांच्या धर्तीवर कॉपी प्रकरणास पूर्णत: प्रतिबंध करण्यासाठी राज्यभर कॉपीमुक्त अभियान यशस्वी करण्याचे आवाहन केले आहे. त्याअनुषंगाने पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येणार आहे.

राज्यातील संवेदनशील परीक्षा केंद्र परिसरामध्ये जिल्हा प्रशासनामार्फत ड्रोन कॅमेराव्दारे परीक्षा केंद्राची निगराणी करण्यात येईल. परीक्षा सुरू होण्याअगोदर एक दिवस आधी परीक्षा केंद्रावर आवश्यक भौतिक सुविधा सुव्यवस्थित आहेत का? याची जिल्हा प्रशासनाकडून खात्री केली जाईल. परीक्षा केंद्राच्या बाहेर जिल्हा प्रशासनामार्फत व्हिडीओ चित्रीकरण करण्यात येईल.

जिल्ह्यातील सर्व विभागाचे शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सहाय्याने कॉपीमुक्त परीक्षा होण्यासाठी सर्व परीक्षा केंद्रांवर भरारी पथके व बैठी पथके उपलब्ध होतील याचे नियोजन करण्यात येणार आहे. जिल्हा प्रशासनाकडून परीक्षा केंद्रावर नियुक्त केलेल्या केंद्रसंचालक, पर्यवेक्षक व परीक्षेशी संबंधीत घटकांची फेसीयल रिकगनायझेशन यंत्रणेद्वारे तपासणी करण्यात येईल. तसेच विभागीय मंडळामार्फत परीक्षेशी संबंधित सर्व घटकांना अधिकृत ओळखपत्र देण्यात येईल. परीक्षा केंद्रापासून ५०० मीटर परिसरात झेरॉक्स सेंटर परीक्षा कालावधीत बंद ठेवण्यात येणार आहेत तसेच संबंधित परीक्षा केंद्राच्या परिसरात १४४ कलम लागू करण्यात येईल.महाराष्ट्र गैरव्यवहार प्रतिबंध कायदा १९८२ या कायद्याची अंमलबजावणी व कोणत्याही परीक्षा केंद्रावर गैरप्रकार घडल्यास, गैरप्रकारांना उद्युक्त करणारे, मदत करणारे व प्रत्यक्ष गैरमार्ग करणाऱ्यांवर दखलपात्र व अजामीनपात्र गुन्हा दाखल करण्यात येईल.

सर्व उपाययोजना करण्यात येणार असून, याची सर्व विद्यार्थी, पालक, शिक्षक व परीक्षेशी संबंधित सर्व घटक यांनी नोंद घ्यावी.

# अनधिकृत बांधकाम केले जमीनदोस्त

## डिवाईन होम स्टेवर मुरुड नगर परिषदेची कार्यवाही

**मुरुड : रामप्रहर वृत्त**

मुरूड शहरातील जसपाल सहानी यांच्या डिवाईन होम स्टेवर मुरुड नगर परिषदेकडून कार्यवाही करण्यात आली आहे.रस्त्यानजीक असणारी संरक्षक भिंत व पर्यटकांना बसण्यासाठी षट्कोनी आकारचे तयार करण्यात आलेले गजेबो जेसीबीच्या साह्याने तोडून टाकण्यात आले आहेत.



मुरूड नगर परिषदेचे मुख्याधिकारी सचिन बच्छाव यांच्या मार्गदर्शनखाली कार्यालयीन अधीक्षक नंदकुमार आंबेतकर, कर निरीक्षक अनिकेत जगदाळे, मुरूड शहर अभियंता अनिकेत वाजे, शहर रचना सहाय्यक अनिकेत भोसले व सर्व नगर परिषद कर्मचारी वृंदांच्या सहकार्याने सदरचे अनधिकृत बांधकाम तोडण्यात आले आहे.

या बाबत मुरूड नगर परिषदेकडून माहिती देण्यात आली की, रस्त्यालगत असणारी संरक्षक भिंत हिची उंची दीड मीटर असणे आवश्यक होती. परंतु संबंधित मालकाने ही भिंत तीन मीटरची बांधली होती.सदरची संरक्षक भिंत जेसीबीच्या साह्याने जमीनदस्त करण्यात आली आहे.डिवाईन होम स्टे मध्ये पर्यटकांना सावलीत बसता यावे म्हणून षट्कोनी आकाराचे गजेबो तयार करण्यात आले होते.हे तीन गजेबो सुद्धा तोडण्यात आले आहेत. तसेच येथे तीन उडन कॉटेज म्हणजेच लाकडी झोपड्या बनवण्यात आल्या होत्या या सुद्धा तोडण्यात आले आहेत. डिवाईन होम स्टे मध्ये अनधिकृत व नियम बाह्य बांधकाम करून टॅक्स न भरणे अश्या बाबी निदर्शनास आल्याने या बांधकामावर कार्यवाही करण्यात आल्याचे सांगण्यात आले.

मुरुड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी सचिन बच्छाव यांनी सांगितले की, अनधिकृत बांधकाम तोडण्यासाठी डिवाईन होम स्टे च्या मालकास ७ दिवसाची नोटीस बजावण्यात आली होती. तरीसुद्धा बांधकाम न हटवल्याने मुरूड नगर परिषदेस सदरची कार्यवाही करावी लागली आहे. हा मालक नगरपरिषदेला रेसिडेन्शियल टॅक्स भरत होता वापर मात्र कमर्शियल करीत होता. पर्यटकांना महागड्या दराने रूम देऊन सुद्धा नगर परिषदेला रेसिडेन्शियल टॅक्स भरीत होता. यामधील काही नविन बांधकाम बांधूनसुद्धा टॅक्ससुद्धा भरत नव्हता त्यामुळे ही कार्यवाही केली असल्याचे मुख्याधिकारी यांनी सांगितले.

## खालापूरात हॉटेल व्यवस्थापक साडे अकरा लाख घेऊन फरार

**खोपोली : प्रतिनिधी**

हॉटेलच्या व्यवसायात जमा झालेली रक्कम मालकाला पोहच करण्याचा बहाणा करून व्यवस्थापक साडेअकरा लाख रुपये घेऊन फरार झाल्याची घटना खालापुरात घडली आहे.

मुंबई पुणे एक्सप्रेसवर श्री गुरूदास कॅफे हॉटेल आहे. मंगळवारी श्री.गुरूदास कॅफे येथे व्यवसायाची जमा झालेली रक्कम ११लाख५० हजार रुपये तिथे काम करणारा परप्रांतीय व्यवस्थापकाने पुणे येथे मालकाला सोपविण्यासाठी जाण्याचा बहाणा करून कोठेतरी पळून गेला.

याबाबत खोपोली पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस हवालदार एस माळी हे करीत आहेत.

# माहिती व तंत्रज्ञान विभाग युनेस्कोसोबत भागीदारी करणार

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र सरकारच्या माहिती व तंत्रज्ञान विभाग युनेस्कोसोबत भागीदारी करणार असून २०२५ हे वर्ष क्वांटम विज्ञान व तंत्रज्ञानशी संबंधीत आंतरराष्ट्रीय वर्ष म्हणून साजरे केले जाणार असल्याची घोषणा माहिती व तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी केली.

नॉबेल पारितोषिक विजेत्या जर्मन भौतिकशास्त्रज्ञ व्हर्नर हायझेनबर्ग यांनी शोधलेली आधुनिक क्वांटम यांत्रिकीच्या १०० व्या वर्धापन दिनानिमित्त, संयुक्त राष्ट्रांनी २०२५ हे वर्ष क्वांटम विज्ञान व तंत्रज्ञानाचे आंतरराष्ट्रीय वर्ष म्हणून घोषित केले आहे. क्वांटम विज्ञानाच्या परिवर्तनकारी क्षमतेला ओळखून, महाराष्ट्र सरकारने या क्षेत्रात संशोधनाचा, नवकल्पनांचा आणि क्षमता निर्माण करण्याचा संकल्प केलेला आहे. ही भागीदारी माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारत २०४७ या दृष्टीकोणाशी जोडलेली आहे. भारत सरकारने २०२३ मध्ये विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयालांतर्गत राष्ट्रीय क्वांटम मिशन सुरू केले असून, ते भारताच्या क्वांटम क्षेत्रातील नव्या संधींसाठी मार्ग तयार करत आहे.



महाराष्ट्र या क्षेत्रातील जागतिक आणि राष्ट्रीय संस्थांसोबत सक्रियपणे जोडले जाण्याचा प्रयत्न करीत असून एक एक महत्त्वाचे पाऊल पुढे टाकत आहे, या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचा भाग म्हणून महाराष्ट्र राज्य माहिती व तंत्रज्ञान विभाग विद्यार्थी, संशोधक आणि उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञांसाठी परिषद, कार्यशाळा आणि तज्ज्ञांची व्याख्याने आयोजित करणार आहे. कौशल्यविकास, तंत्रशिक्षण आणि उद्योग क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालय, राष्ट्रीय क्वांटम मिशन आणि केंद्रीय शिक्षण मंत्रालय यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबवला जाईल डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विश्वविद्यालयासोबत भागीदारी करून क्वांटम संबंधित कौशल्यविकास कार्यक्रम राबवण्याचा आणि केंद्र सरकाराच्या सहकार्याने 'क्वांटम सेंटर ऑफ एक्सलन्स लॅब' स्थापन करण्याचा विचार करत आहे

उच्चस्तरीय तज्ज्ञांच्या टास्कफोर्स अंतर्गत स्थापन करण्यात येणाऱ्या महाराष्ट्रात पहिल्या कृत्रिम बुध्दीमता विद्यापिठाच्या अभ्यासक्रमात क्वांटम तंत्रज्ञानाचा आधिच समावेश करण्यात आला आहे. असल्याचे मंत्री ॲड. शेलार यांनी सांगितले.

# माजी सैनिक पत्नी, विधवा पत्नी यांची बचतगट क्लस्टर योजना

**रायगड : रामप्रहर वृत्त**

सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यातर्फे माजी सैनिक पत्नी/विधवा यांचा ११ च्या समूहाने बचत गट निर्माण करुन बँकेकडून कर्ज घेऊन स्वयंरोजगार सुरु केल्यास अशा बचत गटांना सैनिक कल्याण कार्यालय, रायगड–अलिबाग यांचेकडून कल्याणकारी निधीमधून जास्तीत जास्त १५ लाख रुपयांपर्यंत अनुदान /अर्थ सहायय देण्याची योजना सुरु आहे. प्रकल्प व्यवस्थित सुरु असलेल्या बचतगटांनी संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे.

जिल्हयातील सर्व माजी सैनिक पत्नी / विधवा पत्नी यांना बचत गट स्थापनेसाठी तसेच बचत गटांसाठी विविध स्वयंरोजगार योजनांची माहिती देणे प्रस्तावित आहे. जिल्हयामध्ये अगोदरच बचत गट स्थापन झालेले असल्यास तसेच नविन बचत गट स्थापन करणे करीता माजी सैनिक पत्नी / विधवा पत्नी इच्छूक असल्यास जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, रायगड–अलिबाग येथे संपर्क साधावा.

पान १ वरुन

## कळंबोलीत रंगणार कुस्त्यांचा आखाडा

पुरुषांच्या गटात महाराष्ट्र चॅम्पियन पै. निखिल कदम विरुद्ध महाराष्ट्र चॅम्पियन पै. अनिल कचरे, पै. शुभम वळखडे विरुद्ध पै. आकाश दुबे, पै. श्रेयश कचरे विरुद्ध पै. सुशांत देवमाने, पै. साजन पावशे विरुद्ध पै. निलेश कदम, आणि पै. समाधान घनपट विरुद्ध विजय घुले यांच्या सामना रंगणार आहे. महिला गटात पै. स्नेहा येवले विरुद्ध वैष्णवी यादव आणि पै. रितिका कारंडे विरुद्ध गौरी जाधव यांचा विशेष सामना होणार आहे. कुस्ती स्पर्धेतील महिला ३५, ४० व ४५ किलो वजनाखालील गटातील प्रत्येकी विजेतीला एक हजार रुपये तर उपविजेतीस ५०० रुपये, ५० किलो खालील गटातील विजेतीला १५०० रुपये व तर उपविजेतीस एक हजार रुपये, ५५ किलो वजनाखालील गटातील विजेतीला दोन हजार रुपये तर उपविजेतीस १५०० रुपये आणि ५७ ते ७६ किलो वजनाखालील गटातील विजेतीस १० हजार रुपये व नमो केसरी मानाची गदा तर द्वितीय क्रमांकाला पाच हजार रुपये तर तृतीय क्रमांकाला तीन हजार रुपये, १७ वर्षाखालील मुले गटातील ३०, ३५, ४० व ४५ किलो वजनाखालील गटातील प्रथम क्रमांकास प्रत्येकी एक हजार रुपये तर द्वितीय क्रमांकाला ५०० रुपये, ५० व ५५ किलो खालील गटातील प्रथम क्रमांकाला प्रत्येकी १५०० रुपये द्वितीय क्रमांकास प्रत्येकी एक हजार रुपये, ६०, ६५ आणि ७० किलो वजनाखालील गटातील प्रथम क्रमांकास अनुक्रमे दोन हजार रुपये, तीन हजार रुपये आणि पाच हजार रुपये, द्वितीय क्रमांकास अनुक्रमे १५००, दोन हजार आणि तीन हजार रुपये, वरिष्ठ मुले ५० ते ६० किलो वजनाखालील गटातील प्रथम क्रमांकाला तीन हजार रुपये, द्वितीय क्रमांकास २ हजार रुपये, ६० ते ७० किलो वजनाखालील गटातील प्रथम क्रमांकाला पाच हजार रुपये, द्वितीय क्रमांकास तीन हजार रुपये, ७० ते ७९ किलो वजनाखालील गटातील प्रथम क्रमांकाला पाच हजार रुपये, द्वितीय क्रमांकास तीन हजार रुपये, तसेच ७९ ते १२५ किलो वजनाखालील गटातील प्रथम क्रमांकाला १० हजार रुपये व नमो केसरी मानाची गदा, द्वितीय क्रमांकास पाच हजार रुपये, तर तृतीय क्रमांकाला तीन हजार रुपये असे कुस्ती स्पर्धेत एकूण आठ लाख ५१ हजार रुपयांच्या बक्षिसांचे स्वरूप आहे.

मानाच्या अशा या कुस्ती दंगलीचा कुस्तीप्रेमींनी लाभ घ्यावा, असे आवाहन स्पर्धेचे संयोजक कळंबोली भाजप व पनवेल महानगरपालिकेचे माजी स्थायी समिती सभापती अमर पाटील यांनी केले आहे.

## राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत पनवेलच्या पार्थ मानेला 'सुवर्ण'

केंद्र शासनाच्या क्रीडा विभागाकडून दरवर्षी या राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धांचे आयोजन केले जाते. देशभरातीलविविध राज्यांतील राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये पदकांची कमाई करणाऱ्या खेळाडूंना याराष्ट्रीय स्पर्धेत खेळण्यासाठी पात्र ठरविले जाते. अशा मातब्बर खेळाडूंशी टक्कर देत महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व करताना पार्थने वयाच्या १७ व्या वर्षी मिळविलेले हे यश देशातील युवकांना प्रेरणा देणारे आहे.

आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या नेमबाज सुमा शिरूर यांच्या मार्गदर्शनाखाली त्याने हे भव्यदिव्य यश संपादन केले. त्याच्या या उज्ज्वल यशामुळे पनवेल महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे. पार्थ माने याच्या सुवर्ण कामगिरीबद्दलप्रतिक्रिया देताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर म्हणाले की, महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील आतापर्यंतची ही सर्वोच्च कामगिरी आहे. याआधीहीजिमखाना विभागातील खेळाडूंनी अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये पदकांची लयलूट केली आहे परंतु नेमबाजीसारख्या अवघड व तांत्रिक क्रीडा प्रकारात पार्थने केलेली सुवर्णपदकाची कमाई सर्वोत्तम अशीच म्हणावी लागेल.

रयत शिक्षण संस्थेलाही पार्थच्या या कामगिरीचा नक्कीच गौरव वाटेल. या आनंदाच्या प्रसंगी त्यांनी पार्थ मानेचे व त्याच्या कुटुंबियांचे विशेष अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी त्यालाशुभेच्छा दिल्या. पार्थच्या या सुवर्ण कामगिरीबद्दल महाविद्यालयाच्याजिमखाना कमिटीचे चेअरमन डॉ. प्रफुल्ल वशेणीकर, उपप्राचार्य डॉ. राजाराम पाटील, उपप्राचार्य डॉ. नामदेव पवार, कनिष्ठ महाविद्यालयाच्या विज्ञान विभागाच्या इंचार्ज सुनिता काटकर, कला व वाणिज्य विभागाचे इंचार्ज डॉ. विलास विशे, आयक्यूएसी समन्वयक प्रा. सोपान गोवे, रजिस्ट्रार अनंता जाधव, प्रा. सुनील अवचिते, डॉ. यशवंत उलवेकर, प्रा. प्रवीण गायकर, प्रशिक्षक अक्षय जितेकर, कनिष्ठ महाविद्यालयाचे क्रीडा शिक्षक एस.डी.बडेव जिमखाना कमिटीतील सर्व सदस्यांनी त्याचे विशेष अभिनंदन केले.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, मौजे चिखले, ता. पनवेल, जि. रायगड येथील **नरेश बाळाराम पाटील व इतर** यांचे नावे असलेली, ताबेकब्जातील तसेच मालकी हक्काची नियंत्रित सत्ता प्रकार भोगवटादार क्र. २ ची खालील वर्णनाची शेतजमिन आमचे आशिलांनी मालकी हक्काचे पडताळणी करून खरेदीखताने विकत घेण्याच्या विचारात आहेत.

**शेतजमिनीचे वर्णन**
**मौजे चिखले, तालुका. पनवेल, जि. रायगड.**

| कब्जेदाराचे नाव | गट नं./ सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| नरेश बाळाराम पाटील व इतर | १०२ | ८ | ०–२६–०० | ५.५६ |

सबब वर नमुद शेतजमिन मिळकतीवर, वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षीस, चार्ज, ॲटचमेंट, लीज एम.ओ.यु. वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून **७ दिवसाच्या आत** हक्क हितसंबंधाचे स्वरूप विषेद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येवून भेटावे वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकती तक्रार, दावा वगैरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, दावा हितसंबंध नाही असे समजून आमचे आशिल सदर वर नमुद मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकती, तक्रारी दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्यासोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल, याची तमाम लोकांनी / नागरिकांनी कृपया नोंद घ्यावी.

दिनांक : ०५/०२/२०२५

**सही/–**
ॲड. विजय भगत ॲन्ड असोशिएटस्
(ॲडव्होकेट ॲन्ड लिगल कन्सलटंट)

शॉप नं. १२८, नगरपालीका शॉपींग कॉम्प्लेक्स, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड. मो. ९८२०६०७५७२/९३२२६५२३१९
Email : vijaybhagat43@gmail.com



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, मौजे वांगणी तर्फे वाजे, ता.पनवेल, जि. रायगड येथील **हरेश्वर रामचंद्र पाटील** यांचे नावे असलेली, ताबेकब्जातील तसेच मालकी हक्काची, खुद्द स्वरूपाची खालील वर्णनाची शेतजमिन आमचे आशिलांनी मालकी हक्काने पडताळणी करून खरेदीखताने विकत घेण्याच्या विचारात आहेत.

**शेतजमिनीचे वर्णन**
**मौजे वांगणी तर्फे वाजे, तालुका, पनवेल, जि. रायगड.**

| कब्जेदाराचे नाव | गट नं./ सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| हरेश्वर रामचंद्र पाटील | १७ | | १–६६–२० एकुण क्षेत्रापैकी फेरफार क्र.१३१२ प्रमाणे खरेदी क्षेत्र ०–२०–० हे.आर.चौ.मी. | २.७१ |

सबब वर नमुद शेतजमिन मिळकतीवर, वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षीस, चार्ज, ॲटचमेंट, लीज एम.ओ.यू. वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून **१४ दिवसाच्या आत** हक्क हितसंबंधाचे स्वरूप विषेद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येवून भेटावे वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा वगैरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार दावा हितसंबध नाही असे समजून आमचे आशिल सदर वर नमुद मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकती, तक्रारी दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल, याची तमाम लोकांनी/नागरिकांनी कृपया नोंद घ्यावी.

दिनांक : ०५/०२/२०२५

**सही/–**
ॲड. विजय भगत ॲन्ड असोशिएटस्
(ॲडव्होकेट ॲन्ड लिगल कन्सलटंट)

शॉप नं. १२८, नगरपालीका शॉपींग कॉम्प्लेक्स, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड. मो. ९८२०६०७५७२/९३२२६५२३१९
Email : vijaybhagat43@gmail.com

# बेलापूर-पेंधर मेट्रो सुस्साट धावणार

## ताशी ६० प्रति किमी वेगाने कापणार अंतर

**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबई मेट्रोचा वेग लवकरच वाढणार असून मेट्रोतील प्रवाशांना गारेगार सुस्साट प्रवासाचा अनुभव घेता येणार आहे. सध्या नवी मुंबई मेट्रोचा वेग सरासरी ताशी २५ प्रति किलोमीटर आहे. नुकतेच नवी दिल्लीच्या रेल्वे सुरक्षा विभागाने (कमिशनर ऑफ मेट्रो रेल्वे सेफ्टी-सीएमआरएस) नवी मुंबई मेट्रोच्या बेलापूर ते पेंधर या पहिल्या मार्गिकेवरील वेगाची चाचणी केली. लवकरच नवी मुंबई मेट्रो ताशी ६० प्रति किलोमीटरने सुस्साट धावणार आहे. यामुळे मेट्रोने प्रवास करणाऱ्यांना जलदगतीने अंतर कापता येणार आहे.



सिडको महामंडळाने बांधलेल्या नवी मुंबई मेट्रोचे संचलन सध्या महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड (महामेट्रो) कंपनीमार्फत सुरू आहे. आतापर्यंत ६० लाख प्रवाशांनी या मेट्रोसेवेचा लाभ घेतला आहे. सिडकोला तिकीट दरातून १४ कोटी ५० लाख रुपये महसूली उत्पन्न मिळाले आहे. बेलापूर ते पेंधर या ११.१ किलोमीटरच्या अंतरावर ११ विविध मेट्रो स्थानके आहेत. २० जानेवारीपासून सिडकोने मेट्रो मार्गावर सर्वाधिक गर्दीच्या वेळांमध्ये दर दहा मिनिटांनी मेट्रोची फेरी सुरू केली आहे. गर्दीच्या वेळेत बेलापूर येथून सकाळी साडेसात ते १० वाजता आणि सायंकाळी साडेपाच ते आठ वाजेपर्यंत तर पेंधर येथून सकाळी ७ ते ९.३० आणि सायंकाळी ५ ते ७.३० दरम्यान दर दहा मिनिटांनी मेट्रोची फेरी झाली आहे.

गर्दीच्या वेळा वगळता उर्वरित वेळांमध्ये बेलापूर व पेंधर येथून दर १५ मिनिटांनी मेट्रो धावत आहे. नवी मुंबई मेट्रोला नुकतेच आयएसओ ९००१ - २०१५ हे मानांकन मिळाले आहे. गुणवत्ता व्यवस्थापन, व्यावसायिक स्वास्थ्य तथा सुरक्षा व्यवस्थापन आणि पर्यावरण व्यवस्थापन प्रणाली ही तीनही आयएसओ मानांकने प्राप्त करणारी राज्यातील एकमेव मेट्रो सेवा आहे. मेट्रोला प्रतिताशी ८० किलोमीटरच्या वेगाचे प्रमाणपत्र मिळाल्यानंतर सरळ मेट्रोच्या मार्गिकेवर जास्तीत जास्त प्रतिताशी ७० किलोमीटरच्या वेगाने मेट्रो धावू शकेल, मात्र मेट्रोच्या वळण मार्गावर मेट्रोची गती कमी राहील.

मेट्रोच्या वेगचाचणीचे प्रमाणपत्र मिळाल्यानंतर स्वयंचलित धावणारी संचलनाचे प्रमाणपत्र मिळाल्यानंतर मेट्रोची गती वाढविली जाणार आहे. पुढील दीड महिन्यात वेग चाचणीचे प्रमाणपत्र मिळाण्याची अपेक्षा आहे. त्यानंतर नवी मुंबई मेट्रोतून प्रवाशांना अवघ्या पंधरा मिनिटांत बेलापूर ते पेणधर या मार्गिकेवर प्रवास करता येईल. सिडकोच्या जनसंपर्क विभागाच्या प्रमुख प्रिया रातांबे यांना याबाबत विचारले असता त्यांनी याबाबत माहिती घेऊन प्रतिक्रिया देते, असे सांगितले.



पनवेल : शिवकर येथे अखंड हरिनाम उत्सव श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्याला भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी भेट दिली. त्यांचे आयोजकांनी स्वागत केले. या वेळी माजी पं.स.सदस्य भूपेंद्र पाटील, शिवकरचे सरपंच आनंद ढवळे आदी उपस्थित होते.



उलवे : सेक्टर १७ येथे श्री बिलेश्वर महादेव मंदिरात मुर्ती स्थापना आणि प्राणप्रतिष्ठा महोत्सव आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्याला भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी भेट दिली. त्यांचे आयोजक श्री राधेकृष्णा मंदिर सेवा समिती ट्रस्टकडून स्वागत करण्यात आले.

# रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत प्रबोधन कार्यशाळा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

प्रादेशिक परिवहन कार्यालय आणि ड्रायव्हिंग स्कूल मालक खारघर यांच्या संयुक्त विद्यमाने रस्ता सुरक्षा अभियान २०२५ अंतर्गत प्रबोधन कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेत रस्ता सुरक्षेचे महत्व, वाहतुकीचे नियम आणि सुरक्षित ड्रायव्हिंग याबाबत विद्यार्थी आणि नागरिकांना मार्गदर्शन आणि रस्ता सुरक्षा अभियान प्रबोधन कार्यशाला करण्यात आले.



प्रमुख मार्गदर्शक म्हणून मोटार वाहन निरीक्षक योगेश शितोळे आणि सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक प्रिती पवार यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.कल्याणी सुरज म्हात्रे, भाजप जिल्हा सचिव ब्रिजेश पटेल, शहर अध्यक्ष तथा माजी नगरसेवक प्रवीण पाटील, खारघर उपाध्यक्ष किरण पाटील आदी उपस्थित होते.

सपना पाटील यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना केली. कार्यक्रमाचे आयोजन ग्लोबल इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज (आर्ट्स, कॉमर्स, सायन्स) येथे करण्यात आले होते. या वेळी चेअरमन सुरज नरेश म्हात्रे, प्रिन्सिपल दीपकोर सैनि, मॅनेजमेंट इन्चार्ज रेवी शेलदार उपस्थित होते. या अभियानात मारिया मोटर ड्रायव्हिंग स्कूलचे प्रो. कुमारी दिपा कृष्णा भैरट ओमकार मोटर ड्रायव्हिंग स्कूल प्रो. शिल्पा, खारघर मोटर ड्रायव्हिंग स्कूलचे गणेश सांगले आणि सागर मोटार ड्रायव्हिंग स्कूलचे प्रोप्रायटर सागर भद्रा यांनी आपले महत्त्वपूर्ण योगदान दिले.

कार्यक्रमादरम्यान मेडिकल कॅम्पचे आयोजनदेखील करण्यात आले होते. या उपक्रमामुळे नागरिकांमध्ये रस्ता सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण केली.

# ट्रेलरच्या चाकाखाली येऊन तरुणाचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

कळंबोली येथील लोखंड पोलाद बाजाराचा रस्ता ओलांडताना एक तरुण ट्रेलरच्या चाकाखाली आल्याने जागीच ठार झाला. कळंबोली वसाहतीमध्ये सेक्टर १३ येथे राहणारा मोहम्मद अमन करीम हा तरुण वाहनदुरुस्तीचे काम करत होता.

मोहम्मद लोखंड पोलाद बाजारातील जे. के. मोटर्स या दुकानातून वाहनाचे सुटे भाग खरेदी करून प्रादेशिक परिवहन कार्यालयासमोरीलछ रस्ता ओलांडत होता. त्याच वेळी तेथे आलेला चौदाचाकी मोठा ट्रेलर मोहम्मद याच्या अंगावरून गेल्याने तो जागीच ठार झाला. या अपघातानंतर ट्रेलर ठचालक तेथून पळून गेला होता, मात्र काही वेळातच त्याला शोधण्यात पोलिसांना यश आहे.

पोलिसांनी या प्रकरणी ४० वर्षीय रमाकांत पाल या ट्रेलरचालकाला अटक केली. दरम्यान, या परिसरात पथदिवे नसल्याने हा अपघात झाल्याची माहिती येथील प्रवाशांनी दिली.





पनवेल : तालुक्यातील दुंदरे येथे ग्रामस्थ मंडळ दुंदरे व दुंदरे पाडा यांच्या वतीने साकारलेल्या श्री महागणपती, भैरवनाथ देवता, शिवलिंग, पार्वती माता, क्षेत्रपाला देवता, नंदिदेवता, पालवी देवी यांचा उत्सव सोहळा बुधवारी आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्याला भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी भेट दिली. त्यांचे आयोजकांनी स्वागत केले. या वेळी नेरे जिल्हा परिषद विभागीय अध्यक्ष सुनील पाटील, युवा मोर्चा तालुका सरचिटणीस विश्वजीत पाटील, ग्रामपंचायत सदस्य शांताराम चौधरी, संतोष चौधरी, तंटामुक्त सदस्य गुरुनाथ उसाटकर, राम माळी, सुभाष सिनारे, कृष्णा सिनारे, महदे सिनारे, प्रदीप चौधरी आदी उपस्थित होते.



**पनवेल : निळकंठेश्वर नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन बाळकृष्ण तुळशीराम सत्रे व त्यांच्या सहकाऱ्यांनी बुधवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची सदीच्छा भेट दिली. या वेळी त्यांच्यात विविध विषयांवर चर्चा झाली. भेटीवेळी पथसंस्थेचे व्हाईस चेअरमन दत्तात्रय शिवजी खुस्पे, संचालक बबम शांताराम जाधव, सल्लागार अप्पाजी कदम, मुख्या व्यवस्थापक योगेश चव्हाण, कामोठे शाखा प्रमुख भिकाजी गुजले उपस्थित होते.**

## निवडक

### दुचाकीच्या धडकेत एक जखमी

**पनवेल :** दोन मोटरसायकलमध्ये झालेल्या अपघातात एक जण जखमी झाल्याची घटना पनवेल तालुक्यातील मोर्बे गाव येथील ऐश्वर्या रिसॉर्ट समोरील रस्त्यावर घडली आहे. बाळू गडगे (३८ रा.मोर्बे गाव) हे त्यांच्या ताब्यातील बजाज पल्सर मोटरसायकलवरून मोर्बे गाव ते खैरवाडी असे जात असताना समीर भगत याने त्याच्या ताब्यातील मोटार सायकलवरुन भरधाव वेगाने येवून बाळू गडगे यांच्या मोटार सायकलला पाठीमागून धडक देवून झालेल्या अपघातात बाळू गडगे हे जखमी झाले आहेत. याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### बिल्डींगवरून उडी मारून मृत्यू

**पनवेल :** कोणत्यातरी अज्ञात कारणाने बिल्डींगवरून उडी मारली असता त्यात गंभीररित्या जखमी होवून एकाचा मृत्यू झाल्याची घटना पळस्पे फाटा येथे घडली आहे. जितेंद्र साहू (वय २३) असे या इसमाचे नाव असून त्याने अज्ञात कारणाने बिल्डींगवरून उडी मारली. यात तो गंभीररित्या जखमी झाल्याने उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला आहे. या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# खारघरच्या रामशेठ ठाकूर कॉलेजमध्ये सामंजस्य करार

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात बुधवारी (दि.५) माहिती तंत्रज्ञान व संगणक व एमकेसीएल या दोन्ही संस्थांमध्ये सामंजस्य करार करण्यात आला.

यासाठी एमकेसीएलचे सिद्धेश गोसावी व विश्वास मते यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षरी करून दोन्ही संस्थांमधे ज्ञान-संसाधनाची देवाण-घेवाण होईल अशी हमी दिली. कराराच्या माध्यमातून महाविद्यालयातील माहिती तंत्रज्ञान व संगणक विभागातील विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी वेगवेगळे कोर्सेस सुरू करण्यात येतील तसेच व प्रशिक्षण देण्यात येईल.

करारासाठी प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे, माहिती व तंत्रज्ञान विभागाचे प्रमुख प्रा. राजश्री म्हात्रे व संगणक विभागाचे प्रमुख प्रा. रिजवाना मोमीन, एमकेसीएल समिती समन्वयक प्रा. मनीषा शिलेदार तसेच सर्व प्राध्यापक उपस्थित होते.



# सीकेटी विद्यालयात शुभचिंतन सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालय इंग्रजी माध्यमात मंगळवारी (दि.४) दहावीच्या विद्यार्थ्यांकरिता 'शुभेच्छा चिंतन' सोहळा आयोजित केला गेला.



सीकेटी संकुलातील सर्व विभाग प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रास्ताविकात मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना भरपूर अभ्यास करा आणि विश्वासाने परिक्षेस सामोरे जा असे सांगत बोर्ड परिक्षेस शुभेच्छा दिल्या.

ऋतुजा म्हात्रे, ऋत्विक पाटील, चिन्मय नाईक, साक्षी गोठी, प्रित मढवी, देवेश बुरकर, कनिष्का म्हात्रे, सान्वी म्हात्रे व हिमानी खाने या विद्यार्थ्यांनी आपले भावपूर्ण मनोगत व्यक्त करत शिक्षकांचे आभार मानले. कनिष्का म्हात्रे आणि ऋत्विक पाटील या विद्यार्थी प्रतिनीधींनी वर्गशिक्षक प्रकाश पांढरे, मंजुषा भगत आणि स्वाती काळे यांना पुष्पगुच्छ देऊन वंदन केले.

कार्यक्रमास सीकेटी प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापक निलिमा शिंदे, प्रि प्रायमरी सुपरवायझर वैशाली पारधी, तसेच इंग्रजी माध्यमिक सुपरवायझर निरजा अदुरी हे मान्यवर उपस्थित होते. इंग्रजी प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका निलिमा शिंदे यांनी विद्यार्थ्यांना येणाऱ्या बोर्ड परिक्षेसाठी शुभेच्छा दिल्या.

सर्व दहावीच्या विद्यार्थ्यांना संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, अध्यक्ष अरूणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस. टी गडदे, संस्थेचे सर्व पदाधिकारी, मुख्याध्यापक संतोष चव्हाण, पर्यवेक्षक, मार्गदर्शक शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांजकडून हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.







खारघर : माघी गणेशोत्सवानिमित्त माजी नगरसेवक अभिमन्यू पाटील व नारायणशेठ पाटील यांच्या घरी मुर्बी येथे भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी भेट देत विराजमान गणरायाचे दर्शन घेतले. या वेळी युवा मोर्चा जिल्हा सचिव शुभ पाटील उपस्थित होते.

## संपादकीय

# भारताशी चर्चेनंतरच कारवाई

अमेरिकेच्या लष्करी विमानातून आलेले १०४ बेकायदा भारतीय स्थलांतरित बुधवारी अमृतसर विमानतळावर उतरले. ज्या बेकायदा स्थलांतरितांकडे ते भारताचे नागरिक आहेत हे सिद्ध करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे असतील त्यांचा भारताकडून स्वीकार केला जाईल अशी भूमिका यासंदर्भात भारताने घेतली असून दोन्ही देशांतील चर्चेनुसारच ही कारवाई आहे.

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अलीकडच्या अध्यक्षीय निवडणुकीत अमेरिकेतील बेकायदा स्थलांतराला आळा घालण्याचे आश्वासन दिले होते. राष्ट्राध्यक्षपदी येताच त्यांनी यासंदर्भात झपाट्याने निर्णयांची घोषणा करून आपण दिलेले आश्वासन कठोरपणे पाळणार असल्याचे संकेत दिले. अमेरिकेत १.१० कोटी बेकायदा स्थलांतरित आहेत असे मानले जाते. अनेक देशांचे लोक बेकायदेशीररित्या सीमा ओलांडून अमेरिकेत प्रवेश करतात तर अनेक जण कायदेशीररित्या प्रवेश करून व्हिसाची मुदत संपल्यानंतरही बेकायदा वास्तव्य करतात. ट्रम्प यांच्या आदेशानुसार सध्या अमेरिकेकडून याच बेकायदा स्थलांतरितांना विमानाद्वारे त्यांच्या देशात हद्दपार केले जाते आहे. हद्दपारीसाठी लष्करी विमानांचाही वापर केला जात असून आतापर्यंत ग्वाटेमाला, पेरू, होंडुरास व इक्वेडोर येथे अशी विमाने बेकायदा स्थलांतरितांना घेऊन गेली आहेत. बेकायदा भारतीय स्थलांतरितांना परत पाठवण्याची प्रक्रिया सोमवारी सुरू झाली. अमेरिकेचे लष्करी विमान 'सी-१७' मंगळवारी भारतीय वेळेनुसार पहाटे ३च्या सुमारास टेक्सासच्या सॅन अँटोनियो येथून निघाले व बुधवारी १०४ बेकायदा भारतीय स्थलांतरितांची पहिली तुकडी या विमानातून अमृतसर विमानतळावर उतरली. यात १३ मुले, ७९ पुरुष व २५ महिलांचा समावेश असून गुजरात व हरियाणाचे प्रत्येकी ३३ जण, पंजाबचे ३० आणि महाराष्ट्र व उत्तर प्रदेशचे प्रत्येकी ३ जण यात आहेत. बेकायदा भारतीय स्थलांतरितांना पाठवण्यासाठी अमेरिकेने लष्करी विमानाचा वापर केल्याबद्दल आपल्याकडे भिवया उंचावल्या गेल्या. परंतु हा संबंधित कारवाई कठोरपणे राबवण्याचा एक भाग आहे. जर कुणी अमेरिकेत बेकायदेशीर प्रवेश केला तर त्यांना गंभीर परिणामांना सामोरे जावे लागेल हे ट्रम्प यांना जगाला सांगायचे आहे. वास्तविक लष्करी विमानांचा वापर सामान्य विमानांपेक्षा खूपच महाग आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी याच महिन्यात अमेरिकेचा दौरा करणार असून ते ट्रम्प यांची भेटही घेणार आहेत. असे असताना उभयतांमधील चर्चेची वाट न पाहता अमेरिकेने कारवाई सुरू केली अशी टिप्पणीही यासंदर्भात होते आहे. परंतु प्रत्यक्षात अमेरिकी प्रशासनाने यासंदर्भात परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांच्याशी चर्चा केली असून भारताने अमेरिकेत बेकायदा वास्तव्य करणाऱ्या आपल्या नागरिकांना स्वीकारण्याची तयारी दर्शवली आहे. अशा जवळपास २० हजार बेकायदा भारतीय स्थलांतरितांना परत पाठवण्याची तयारी अमेरिकेच्या स्थलांतर विभागाने केली आहे असे समजते. अमेरिकेत जवळपास सात लाख २५ हजार बेकायदा भारतीय स्थलांतरित तूर्तास आहेत असे समजते. गेल्या वर्षीही अमेरिकेतून जवळपास ११०० बेकायदा स्थलांतरितांना विशेष विमानाने भारतात परत पाठवण्यात आले होते. परंतु सध्या सुरू असलेली कारवाई ही अमेरिकेच्या आजवरच्या इतिहासातील सर्वात मोठी कारवाई मानली जाते. वास्तविक बेकायदा स्थलांतरितांची किंबहुना घुसखोरांची समस्या सध्या जगातील अनेक देशांना भेडसावत असून भारताचाही त्यात समावेश आहे. बांगलादेशी घुसखोरांसह अन्य काही शेजारी देशांमधूनही भारतात बेकायदा स्थलांतरित येत असतात. ट्रम्प यांच्या कठोर धोरणाप्रमाणेच भारतानेही आपल्या भूमीवरील घुसखोरांविरोधात अशीच कठोर कारवाई करावी असा सूर देशातील जनतेकडून आता लागतो आहे.**

# कोकणात खैर तस्करीत वाढ





### खबरबात
शैलेश पालकर

कोकणातील खैरतस्करांचे धाबे दणाणून सोडणारा निकाल मुंबई उच्च न्यायालयाने दिल्यानंतरदेखील गेल्या सहा महिन्यांमध्ये मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरील पोलादपूर ते महाड दरम्यानच्या मार्गावर वाहतूक पोलीस आणि वनविभागाच्या अधिकारीवर्गाने केलेल्या धाडसत्रात सुमारे एक कोटीहून अधिक मालाची तस्करी उघडकीस आली आहे.

पोलादपूर शहरातील वनउपज तपासणी नाक्यावर अक्षरश: धूळफेक करण्यात यशस्वी झालेल्या खैरमाफियांना चुकून अडवून तपासणी करणाऱ्या वाहतूक पोलिसांना खैरापासून तयार केलेल्या काताचा अर्क असलेल्या २४० पिंपांचा सुगावा लागल्याची घटना खैरतस्करीचे नवे तंत्र अस्तित्वात आल्याची धोक्याची घंटा वाजवित आहे. आतापर्यंत खैराची लाकडे अन्य लाकडांमधून वाहतूक करून नेण्याचे तंत्र आत्मसात असलेल्या खैर तस्करांनी गावोगांव खैर सोलीव ओंडके जमा करणारे एजन्ट नेमण्याचे सत्रही अवलंबिले होते. एका ट्रकमध्ये साधारणपणे ५-७ लाखांचा माल घेऊन जाताना ट्रक पकडल्यास खैर आणि ट्रक दोन्हीही पकडले जाऊन या तस्कराचे सुमारे १५ लाखांचे नुकसान होत असे.

सोमवारी पोलादपूर वनउपज नाक्यावर दोन ट्रक भरलेले खैराचे सोलीव लाकूड जप्त करण्यात वनविभागाला यश आले आहे. मात्र, त्यामध्ये खैराचे सोलीव लाकूड वाहतूकीसाठी पूर्ण क्षमता असूनही केवळ १८२ नग म्हणजेच फक्त ५२ हजार ८०६ रूपयांच्या खैराची सोलीव लाकडं पकडली जाणे आश्चर्यकारक घटना आहे. पोलादपूर वनउपज तपासणी नाका येथून महाड एमआयडीसीपर्यंत खैराची अर्कवाहतूक विनासायास होऊन देतो तशीच पकडलेल्या सोलीव लाकडांची संख्याही कमी करतो,असा अनुभव गेल्या काही घटनांमधून उघडकीस आला आहे. गेल्या काही वर्षांपासून गुजरात राज्याच्या जीएसटीसी गुजरात स्टेट ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशनच्या बसमधून गुटखा व खैनीसदृश्य तयार मालाची वाहतूक होत असल्याचे काही धाडीमधून स्पष्ट झाले होते. पोलादपूर तालुक्यात शेवटचा थांबा असलेल्या गुजरात राज्याच्या बसचा मुक्काम पोलादपूर वनउपज तपासणी नाक्याजवळच्या ढाब्याजवळ असतो. पोलादपूर ते मुंबईपर्यंत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसची प्रवासी वाहतूक सुरू होत नसताना गुजरात राज्याची बस नियमितपणे वाहतूक करीत असल्याचे आश्चर्य कोणालाही वाटत नाही, मात्र नाशिकच्या वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी मुंबई उच्च न्यायालयाला खैरतस्करीचे चिपळूण कनेक्शन दाखविल्यानंतर त्याच नाशिक जिल्ह्यातील मालेगांव येथील तस्करांमार्फत चिपळूणकडे खैराची सोलीव लाकडे वाहतूक करताना पोलादपूर येथे वनविभागामार्फत कारवाई होणे ही बाब जनहित याचिकाकर्त्याने विचारात घेण्याची वेळ आली आहे.

महामार्गावरून मालवाहतूक करणाऱ्या अथवा कोकण रेल्वेच्या रोरो सेवेद्वारे जाणाऱ्या ट्रकचा या ख्र आणि कातअर्काच्या तस्करीच्या व्यवसायामध्ये वापर केला जात असतो. ही बाब उघडकीस आली असली तरी यामध्ये पोलीसांना माहिती देणाऱ्या खबरींची यंत्रणा आहे; तशीच वनविभागाला गाफिल करणारी यंत्रणाही असण्याची शक्यता दिसून येत असल्याने खैरतस्करांच्या या खैर काताच्या अर्काची वाहतूक करण्याच्या नव्या शक्कलीमुळे पोलादपूर व महाड येथील वनविभागाच्या डोळयांत धूळफेक करून ट्रक विनासायास वनउपज तपासणी नाक्यासमोरून घेऊन जाण्याची चतुराई या तस्करांना कशामुळे प्राप्त झाली हा यक्षप्रश्न आहे.

मुंबई उच्च न्यायालयाने चिपळूण परिसरातील सर्व १०२ काथनिर्मितीचे कारखाने बंद करण्याचे आदेश बजावल्यानंतरदेखील चिपळूणच्या दिशेने खैराची वाहतूक आणि चिपळूणकडून गुजरातच्या दिशेने काथाचा अर्काच्या ड्रम्सची वाहतूक हा प्रकार मुंबई उच्च न्यायालयापेक्षाही 'महाशक्तीचा प्रभाव' या तस्करीवर असल्यानेच सर्व विनासायास सुरू असल्याचे दिसून येत आहे.

नाशिकच्या वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी खैरतस्करीचे चिपळूण कनेक्शन उघड करीत सिंधुदुर्ग आणि चिपळूण जिल्ह्यातील १०२ पैकी ६० काथनिर्मितीचे कारखाने बंद केले तर उर्वरित ४२ कारखाने रात्रंदिवस सुरू आहेत. काही घनमीटर खैर सोलीव लाकडाची प्रक्रिया होत असल्याचे कागदोपत्री दाखवून प्रत्यक्षात शेकडो एजन्टसद्वारे हजारो टन खैराचे सोलीव लाकूड आणून त्यावर प्रक्रिया करताना ठराविक मुदतीचे परवाने दिले असताना परवान्यातील विहित मुदत संपल्यानंतरही खैरप्रक्रिया या काथनिर्मिती कारखान्यांमध्ये होत असल्याने वनविभागाच्या एसएलसी कमिटीने दिलेल्या काथनिर्मिती कारखान्यांच्या सर्व परवानग्या रद्द करण्याची गरज निर्माण झाले आहे. वनक्षेत्राचे संरक्षण झाले पाहिजे, या हेतूने काथनिर्मिती कारखान्यांवर कारवाई करण्याची जनहित याचिका मुंबई उच्च न्यायालयामध्ये दाखल झाल्यानंतर उच्च न्यायालयाने यामधील दोषी अधिकाऱ्यांविरूध्द कारवाईचा बडगा उचलण्याची मुभा देत ज्या काथनिर्मिती कारखान्याचे मालक खैर तस्करीशी संबंधित आहेत त्यांच्याविरूध्द दशतवादी विरोधी पथक म्हणजेच 'एटीएस' आणि सक्तवसुली संचालनालयामार्फत म्हणजेच 'इडी'मार्फत कारवाईची सुरूवात झाली होती.

उच्च न्यायालयासमोर खैरतस्करांचे चिपळूण कनेक्शन उघड करणाऱ्या नाशिक वनविभागाच्या अधिकाऱ्यांना नाशिकच्या खैरतस्करांची साथ आताही कोकणातील वनविभागाचे अधिकारी आणि काथनिर्मिती करणारे कारखानदार यांना मिळत असल्याचे उघड झाले आहे.



## बदलते तंत्रज्ञान

### तुमच्या व्यवसायासाठी 'अशी' बनवा वेबसाईट





सध्या आपण सगळेच विविध तंत्रज्ञानमय जगात वावरतो आहोत. या आधुनिक जगात संगणक कोडिंग हे एक महत्त्वाचे कौशल्य ठरते आहे. कोडिंगमुळे मानवाला या उपकरणांशी संवाद साधता येतो, पण सह-संस्थापक व शार्क टँक इंडियाचे न्यायाधीश अझहर इक्बाल यांनी इनशॉर्ट्सचे माजी तंत्रज्ञान प्रमुख मनीष सिंग बिश्त यांच्याबरोबर मिळून फेनाडो एआय हा नवा उपक्रम सुरू केला आहे.

कंपनीच्या माहितीनुसार Fenado AI हे स्टार्टअप्स, छोटे व्यवसाय आणि मोठ्या संस्थांसाठी डिझाइन केले आहे, जे एंड-टू-एंड टेक सोल्यूशन्स ऑफर करत आहेत, ज्यांच्याकडे कोडिंग कौशल्य नसेल त्यांनासुद्धा काही मिनिटांत प्स आणि वेबसाइट तयार करण्यात प्लॅटफॉर्म मदत करणार आहे.

Fenado AIचे सह-संस्थापक व सीईओ इक्बाल यांनी YourStoryला सांगितले की, आमचा प्रस्ताव अगदी सोपा आहे. प्रत्येक स्टार्टअपला कोडिंग, अॅप डेव्हलपमेंट व वेबसाइट निर्मितीमध्ये कौशल्य असलेल्या म्हणजेच अगदी सर्व तांत्रिक ज्ञानाने संपन्न असलेल्या सह-संस्थापकाची आवश्यकता असते, पण आता एआयमधील प्रगतीमुळे ही बाब आता स्वतंत्रपणे हाताळले जाऊ शकते. Fenado AI हे कोडिंग ज्ञान नसलेल्या कोणत्याही व्यक्तीस अॅप किंवा वेबसाइट तयार करण्यास अनुमती देणार आहे. हे स्टार्टअप्स त्यांच्यासाठी खास असेल, ज्यांना तंत्रज्ञानाचे फारसे ज्ञान नाही. अनेक दशकांपासून चांगल्या कल्पना डोक्यात असूनसुद्धा अनेक उद्योजकांना परवडणाऱ्या आणि टेक टॅलेंटच्या कमतरतेमुळे अनेकदा अपयश आले आहे, अशा त्या सगळ्यांसाठीच हा उपक्रम आहे, असे त्यांनी सांगितले आहे.

उद्योजक आणि व्यावसायिकांना त्यांच्या तंत्रज्ञानाच्या गरजा व्यवस्थापित करून मदत करणे, त्यांचा वेळ वाचवणे, खर्च कमी करणे, नवीन कल्पना वापरणे आणि त्यांचे लक्ष मुख्य धोरणांवर केंद्रित करणे हे या स्टार्टअपचे उद्दिष्ट असणार आहे. कोणताही व्यवसाय किंवा उद्योजक चॅटद्वारे त्यांच्या गरजा आणि डिझाइन प्राधान्ये सामायिक करून त्यांच्या व्यवसायासाठी प्लॅटफॉर्म अॅप किंवा वेबसाइट तयार करू शकणार आहेत. त्यासाठी कोडिंग कौशल्य किंवा टेक टीमची गरज भासणार नाही.

# गानसम्राज्ञी लता मंगेशकर



### निमित्त

आजच्या युगात लता मंगेशकर यांना ओळखत नसेल असा व्यक्ती होऊच शकत नाही. लतादीदींच्या स्वरात त्यांच्या आवाजात जादू काही वेगळीच होती. साक्षात सरस्वती त्यांच्या गळ्यात विराजमान झालेली होती. आज लतादिदींचा स्मृतिदिन...

लता मंगेशकर यांचा जन्म २८ सप्टेंबर १९२९ रोजी मध्य प्रदेशातील इंदुर येथे एका गायक परिवारात झाला. मराठी रंभूमीवरील प्रसिद्ध गायक व नट दिनानाथ मंगेशकर यांच्या त्या ज्येष्ठ कन्या होत्या. वडील गायक असल्यामुळे लहानपणापासूनच लतादिदींना गायनाचे शिक्षण मिळाले. पुढे लता १३ वर्षांची असताना त्यांचे वडील वारले आणि संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी दिदींवर आली.

लतादिदींची भावंडे म्हणजे आशा, उषा, मीना आणि हृदयनाथ मंगेशकर. लहानपणी दिदींनी काही चित्रपटात बाल कलाकार म्हणून काम केले. त्यांना लहानपणी हेमा म्हटले जायचे, पण त्यांच्या वडिलांनी भावबंधन नाटकातील गायिकेच्या नावावरून लता हे नाव ठेवले. वयाच्या नवव्या वर्षातच त्यांनी शास्त्रीय संगीत क्षेत्रात आपले प्रभुत्व प्रस्तापित केले.

शास्त्रीय संगीताचे शिक्षण लतादिदींनी उस्ताद अमानत खान, बडे गुलाम अली खान, पंडित तुळशीदास शर्मा, अमानतखान देवसल्ले यांच्याकडून घेतले. दिदींनी जरी आपल्या जीवनाची सुरुवात मराठी चित्रपटातून केली असली तरी पुढे जाऊन त्यांनी मराठी, हिंदी, गुजराती, पंजाबी असा अनेक भाषेत आपले व्यक्तिमत्व गाण्याद्वारे उमटवले.

लता मंगेशकर यांनी त्यांच्या आवाजात अनेक गाणी गायली. कधी त्यांच्या आवाजात प्रेमाची भावना, कधी दुःखाची जाणीव. तर कधी सीमेवर तैनात सैनिकांचा उत्साह वाढवत असे. भारताचे तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू हेदेखील ये मेरे वतन के लोगो हे गाणं ऐकून रडले होते. अशी जादू त्यांच्या आवाजात होती.

लता मंगेशकर यांनी २५ भाषेत गाणी गायली आहेत. सर्वात जास्त गाणी असल्याचा विक्रमही त्यांच्याच नावावर आहे. तब्बल सहा दशक दिदींनी गायनाच्या दुनियेत राज केले.

लतादिदींना १९५८मध्ये मधुमती या चित्रपटात सलील चौधरी यांनी स्वरबध्द केलेल्या आजा रे परदेशी या गाण्यासाठी सर्वप्रथम सर्वोत्कृष्ट पार्श्वगायिका म्हणून पुरस्कार देण्यात आला. १९६२मध्ये त्यांना दुसरा फिल्मफेअर अवॉर्ड मिळाला. पुढे त्यांना असे अनेक पुरस्कार मिळाले. भारताचा सर्वोत्कृष्ट पुरस्कार भारतरत्न, पद्मश्री, पद्मभूषण हेही पुरस्कार देण्यात आले आहेत.

आपल्या सर्वांच्या लाडक्या लता मंगेशकर यांनी ६ फेब्रुवारी २०२२ रोजी या दुनियेतील अखेरचा श्वास घेतला. या जगातून त्या निघून गेल्या, परंतु ठेवून गेल्या त्या त्यांनी गायलेल्या गोड आवाजातली गाणी. जाताना त्या सांगून गेल्या या जगाला की 'नाम गुम जायेगा, चेहरा ये बदल जायेगा.. मेरी आवाज ही, पहचान है गर याद रहे...

**(साभार : किनारा मराठीचा)**


### बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

### रोज सकाळी रिकाम्या पोटी दही खाल्ल्याचे फायदे

सध्याच्या काळात फिट राहणं फार गरजेचं झालं आहे. त्यासाठी प्रत्येक जण आपापल्या पद्धतीने वेगवेगळे उपाय करून पाहतो. तुम्हालादेखील तुमच्या दिवसाची सुरुवात आरोग्यदायी पद्धतीने करायची आहे? तर मग दह्याशिवाय चांगला पर्याय नाही. तुमच्या दिवसाची सुरुवात करण्यासाठी पोषक घटकांनी युक्त दही हा एक उत्तम पर्याय आहे,



पण तुम्हाला सकाळी रिकाम्या पोटी दही खाल्ल्यानं शरीरावर काय परिणाम होतात हे माहितीये का? क्लिनिकल आहारतज्ञ गरिमा गोयल यांनी या संदर्भात सविस्तर माहिती दिली आहे. प्रोबायोटिक्सने समृद्ध दही हा प्रोबायोटिक्सचे नैसर्गिक स्रोत आहे. प्रोबायोटिक्स म्हणजे आपल्या आरोग्यासाठी हातभार लावणारे चांगले जीवाणू. जीवाणू म्हटलं, की ऐकायला थोडंसं विचित्र वाटतं खरं; पण आपल्या पोटात असे 'चांगले' जीवाणू असणं गरजेचं असतं. ते आपल्या पचनासाठी मदत करतात आणि आवश्यकही असतात. जे पचन सुधारून आतड्याच्या आरोग्यास प्रोत्साहन देतात. रिकाम्या पोटी दही खाल्ल्यानं तुमची पचनसंस्था दिवसभरासाठी तयार होण्यास मदत होते. प्रोबायोटिक्सदेखील पोषक शोषण वाढवतात, पोट फुगणं कमी करतात आणि नियमित आतड्याच्या हालचालींना समर्थन देतात.

सकाळी रिकाम्या पोटी दही खाल्ल्याने कॅल्शियम, प्रथिने आणि ब जीवनसत्त्वे यांसारख्या आवश्यक पोषक घटकांचा शरीराला पुरवठा होतो. गोयल पुढे म्हणाले, हे पोषक घटक ऊर्जा देतात आणि हाडांचे आरोग्य व स्नायुबल वाढवण्यासाठी मदत करतात

**हायड्रेटिंग आणि कूलिंग** - दह्यामध्ये पाण्याचे प्रमाण जास्त असते, जे शरीराला हायड्रेट करण्यास मदत करते. विशेषतः गरम हवामानात. त्याचे नैसर्गिक थंड गुणधर्म शरीरातील उष्णता कमी करू शकतात आणि निर्जलीकरण टाळू शकतात.

**अॅसिडीटीचा धोका** - काही लोकांसाठी रिकाम्या पोटी दही खाल्ल्याने अॅसिडिटी वाढू शकते. हे संवेदनशील पोट असलेल्या किंवा अॅसिड रिफ्लक्सचा धोका असलेल्या व्यक्तींसाठी आहे. दह्यातील लॅक्टिक अॅसिड रिकाम्या पोटी एकत्रित केल्याने अस्वस्थता किंवा सूज येऊ शकते. त्यामुळे काही गोष्टी पाळून व शरीर पाहून दह्याचे सेवन करणे उत्तम!

महाराष्ट्र शासन राजपत्र भाग एक कोकण विभागीय पुरवणी,
गुरुत्वार ते बुधवार, डिसेंबर २६, २०२४–जानेवारी १, २०२५/पौष ५–१९, शके १९४६

## उप विभागीय, अधिकारी कार्यालय, पेण यांजकडून

## अधिसूचना

क्रमांक उविअ/भूसंपादन/कलम ११/उरण–उस र/खा.दु.बो/२०२४

**भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक एलएक्यू/एसआर/२१४/२०२१. ज्याअर्थी, भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक संकिर्ण–११/२०१४/प्र.क्र. ७७/अ–२, दिनांक १९ जानेवारी २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश उक्त अधिसूचना असा करण्यात आला आहे.) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड–अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील ५०० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल :

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, रायगड जिल्ह्याच्या जिल्हाधिका–यास यासोबत जोडलेल्या अनुसूची–एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश उक्त जमीन असा करण्यात आला आहे.) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्यांचा निर्देश उक्त सार्वजनिक प्रयोजन असा करण्यात आला आहे.) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते, ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची दोन मध्ये दिलेले आहे, आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट–कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे :

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमी संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची–तीन मध्ये दिलेली आहे.

आणि ज्याअर्थी, सामाजिक आघात निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची–चार मध्ये दिलेला आहे;

आणि ज्याअर्थी, कलम ४३ पोट–कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची–पाच मध्ये दिलेला आहे.

त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११, पोट–कलम ४ अनुसार कोणतीही व्यक्ती ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण–चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिका–यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकास उक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल;

परंतु, आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुद्धीपुरस्पर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिका–यांकडून भरपाई दिली जाणार नाही;

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट–कलम (५) अनुसार, जिल्हाधिकारी, भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त नियम असा करण्यात आला आहे) यांच्या नियम १० च्या उपनियम (३) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमी अभिलेखाच्या अद्ययावतीकरण काम हाता घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) आणि मा. जिल्हाधिकारी, रायगड यांजकडील आदेश क्रमांक भूसं/टे–६/ ६४८९८० मौजे खारदुतर्फा बोली/२०२३, दिनांक १३ सप्टेंबर २०२३ अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिका–यांची कार्य पार पाडण्यासाठी समुचीत शासन उप विभागीय अधिकारी, पेण यांस पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची– एक**

**जमिनीचे वर्णन**

**गावाचे नाव खारदुतर्फा बोर्ली, ता. पेण, जिल्हा रायगड**

| अ.क्र. (१) | गट नंबर (२) | संपादीत क्षेत्र (हे. आर) (३) |
|---|---|---|
| १ | १४१/१ | ०.२९–७० |
| | एकूण | ०.२९–७० |

**अनुसूची– दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण**

**प्रकल्पाचे नाव :–** मौजे खारदुतर्फा बोर्ली, ता. पेण, जि. रायगड येथील उरण–उसर प्रोपेन पाईप लाईनच्या सुरक्षेकरिता एस. वी. स्टेशन (SECTIONALIZING VALVE STATION) च्य निर्माणाकरिता.

**प्रकल्पाचे विवरण :–** मौजे खारदुतर्फा बोर्ली, ता. पेण, जि. रायगड येथील उरण–उसर प्रोपेन पाईप लाईनच्या सुरक्षेकरिता एस. वी. स्टेशन (SECTIONALIZING VALVE STATION) भूसंपादन करण्यासाठी ०.२९.७० हे. आर क्षेत्र संपादीत होणार आहे.

**सामाजिक फायदे :–** करांच्या माध्यमातून राज्य सरकारच्या महसुलाची निर्मिती, अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती आणि सामाजिक आर्थिक विकास साध्य करणे.

**अनुसूची– तीन**

**पुनर्वसन विषयक बाबींचे विवरण :– निरंक**

**अनुसूची– चार**

**सामाजिक आघातनिर्धारण अहवालाचा गोषवारा :– महाराष्ट्र शासन राजपत्र** असाधारण भाग चार–अ, दिनांक १० ऑक्टोबर २०२४ अन्वये भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ मधील कलम १०क द्वारे लोकहितास्तव उक्त अधिनियमाच्या प्रकरण २ आणि प्रकरण ३ च्या तरतुदी लागू करण्यापासून सूट दिली आहे.

**अनुसूची– पाच**

**प्रशासक नियुक्तीचे विवरण :– निरंक**

सदर अधिसूचनेद्वारे ज्या जमिनीची सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासण्याचा संभव असल्याचे कायद्याच्या कलम ११ चे उप कलम (१) खाली अधिसूचित करण्यात आले आहे. प्रारंभिक अधिसूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत उप विभागीय अधिकारी, पेण तथा भूसंपादन अधिकारी, पेण यांचे कार्यालयात आक्षेप नोंदविता येईल.

**टीप–** संपादित जमिनींचा नकाशा पाहण्यासाठी उप विभागीय अधिकारी कार्यालय, पेण यांचे कार्यालयात उपलब्ध आहे.

**पेण,**
**दिनांक १८ डिसेंबर २०२४.**

**सही/–**
**प्रविण ज्ञानू पवार,**
**उप विभागीय अधिकारी, पेण,**
**उप विभाग, पेण.**

---

महाराष्ट्र शासन राजपत्र भाग एक कोकण विभागीय पुरवणी,
गुरुत्वार ते बुधवार, डिसेंबर २६, २०२४–जानेवारी १, २०२५/पौष ५–१९, शके १९४६

## उप विभागीय, अधिकारी कार्यालय, पेण यांजकडून

## अधिसूचना

क्रमांक उविअ/भूसंपादन/कलम ११/उरण–उसर/ओढांगी/२०२४

**भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक एलएक्यू/एसआर/२१४/२०२९. ज्याअर्थी, भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक संकिर्ण–११/२०१४/प्र.क्र. ७७/अ–२, दिनांक १९ जानेवारी २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश उक्त अधिसूचना असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड–अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील ५००० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता भूमीसंपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल :

आणि ज्याअर्चा, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, रायगड जिल्ह्याच्या जिल्हाधिका–यास यासोबत जोडलेल्या अनुसूची–एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश उक्त जमीन असा करण्यात आला आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त सार्वजनिक प्रयोजन असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते, ज्याच्या स्वरूपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची–दोन मध्ये दिलेले आहे, आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट–कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे :

आणि ज्याअथी, प्रस्तावित भूमी संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची–तीन मध्ये दिलेली आहेत.

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम आघात निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची–चार मध्ये दिलेला आहे;

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट–कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची–पाच मध्ये दिलेला आहे.

त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट–कलम ४ अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण–चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिका–यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकास उक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल;

परंतु, आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुद्धीपुरस्पर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिका–यांकडून भरपाई दिली जाणार नाही;

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट–कलम (५) अनुसार, जिल्हाधिकारी, भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश उक्त नियम असा करण्यात आला आहे) यांच्या नियम १० च्या उप–नियम (३) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमी अभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाता घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) आणि मा. जिल्हाधिकारी, रायगड यांजकडील आदेश क्रमांक भूर्स/टे–६/ ६४८९५९ मौजे ओढांगी/२०१३, दिनांक १३ साप्टेंबर २०२३ अन्यये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनयमाखालील जिल्हाधिका–यांची कार्य पार पाडण्यासाठी समुचीत शासन उप विभागीय अधिकारी, पेण यांस पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची– एक**

**जमिनीचे वर्णन**

**गावाचे नाव मौजे ओढांगी, ता. पेण, जिल्हा रायगड**

| अ.क्र. (१) | गट नंबर (२) | संपादीत क्षेत्र (हे. आर) (३) |
|---|---|---|
| १ | १९१ | ०.२१–६० |
| | एकूण | ०.२१–६० |

**अनुसूची– दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण**

**प्रकल्पाचे नाव :–** मौजे ओढांगी, ता. पेण, जि. रायगड येथील उरण–उसर प्रोपेन पाईप लाईनच्या सुरक्षेकरिता एस. वी. स्टेशन (SECTIONALIZING VALVE STATION) च्या निर्माणाकरिता.

**प्रकल्पाचे विवरण :–** मौजे ओढोंगी, ता. पेण, जि. रायगड येथील उरण–उसर प्रोपेन पाईप लाईनच्या सुरक्षेकरिता एस. बी. स्टेशन (SECTIONALIZING VALVE STATION) भूसंपादन करण्यासाठी ०.२१.६० हे. आर क्षेत्र संपादित होणार आहे.

**समाजिक फायदे :–** करांच्या माध्यमातून राज्य सरकारच्या महसुलाची निर्मिती, अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती आणि सामाजिक आर्थिक विकास साध्य करणे,

**अनुसूची तीन**

**पुनर्वसन विषयक बाबींचे विवरण– निरंक**

**अनुसूची चार**

**सामाजिक आघातनिर्धारण अहवालाचा गोषवारा :–** महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण, भाग चार–अ, दिनांक १० ऑक्टोबर २०२४ अन्वये भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ मधील कलम १०क द्वारे लोकहितास्तव उक्त अधिनियमाच्या प्रकरण २ आणि प्रकरण ३ च्या तरतुदी लागू करण्यापासून सूट दिली आहे.

**अनुसूची पाच**

**प्रशासक नियुक्तीचे विवरण. – निरंक**

सदर अधिसूचनेद्वारे ज्या जमिनीची सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासण्याचा संभव असल्याचे कायद्याच्या कलम ११ चे उप–कलम (१) खाली अधिसूचित करण्यात आले आहे. प्रारंभिक अधिसूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत उप विभागीय अधिकारी, पेण तथा भूसंपादन अधिकारी, पेण यांचे कार्यालयात आक्षेप नोंदविता येईल.

**टीप–** संपादित जमिनींचा नकाशा पाहण्यासाठी उप विभागीय अधिकारी कार्यालय, पेण यांचे कार्यालयात उपलब्ध आहे.

**पेण,**
**दिनांक १८ डिसेंबर २०२४.**

**सही/–**
**प्रविण ज्ञानू पवार,**
**उप विभागीय अधिकारी, पेण,**
**उप विभाग, पेण.**

**क्र. जिमाका/राअ/जाहि/२३०/२०२४ – २५**

# नवी मुंबईत सर्वत्र भिकाऱ्यांचा उपद्रव

## पालिका, पोलीस प्रशासनाकडे कारवाईची मागणी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईत गेल्या काही दिवसांपासून भिकाऱ्यांची संख्या वाढली आहे. हे भिकारी सिग्नलवर मॉलच्या बाहेर, गर्दी असलेल्या मिठाई दुकानाबाहेर मोठ्या संख्येने आढळून येतात. शिवाय घणसोली, सीवूड्स, सानपाडा उड्डाणपुलाखाली पथारी त्यांनी पसरलेली असते. त्यामुळे अस्वच्छता, भांडणे यातून छोटे मोठे गुन्हे घडत आहेत. या समस्येबाबत मनपा व पोलीस प्रशासन उदासीन असल्याचे दिसून येत आहे.



नवी मुंबईत भिकाऱ्यांनी अनेक ठिकाणी उच्छाद मांडला आहे. रस्त्याने चालत असताना दोन-चार मुले किंवा तान्हे मूल कडेवर घेतलेली महिला पैसे द्या म्हणून मागे लागतात. कितीही दुर्लक्ष केले किंवा झिडकारले तरी पैसे घेतल्याशिवाय पिच्छा सोडत नाहीत. भीक मागताना तरुण जोडपी, महिला, मुलामुलींचा समूहाला लक्ष्य केले जाते, अशी प्रतिक्रिया सतीश कांबळे या वाशीतील राहिवशाने दिली. घणसोली उड्डाणपुलाखाली असणाऱ्या भिकाऱ्यांना काही महिन्यांपूर्वी हुसकावून लावण्यात आले होते, मात्र हुसकावून लावले की ते अन्यत्र कुठे तरी जाऊन तेच काम करतात. सध्या सीवूड्स ग्रँड सेंटर मॉल परिसरात त्यातील अनेक जण राहत आहेत.

हे सर्व भिकारी रात्री पदपथावर झोपलेले असतात. त्यामुळे एखाद्या गाडीचे नियंत्रण सुटून गाडी पदपथावर चढली तर मुंबईतील घटनेप्रमाणे मोठी जीवितहानी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. येथे स्वीट मार्ट, चहा, वडापाव समोसा, पाणीपुरी अशा दुकानांची रेलचेल आहे. या भिकाऱ्यांना खाद्य पदार्थ दिले तरी नको असतात पैशांनीच मागणी केली जाते असा अनुभव सारिका पडवळ यांनी सांगितला.

> **कांदळवनाची सुरक्षा धोक्यात, उरणमधील कांदळवने विविध मार्गांनी नष्ट करण्याचे प्रयत्न या समस्येविषयी काही तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. संबंधित पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकांना कारवाईच्या सूचना केल्या आहेत.**
> **-पंकज डहाणे,**
> **पोलीस उपायुक्त परिमंडळ एक**

या परिसरातील रहिवासी संकुलात भुरट्या चोरींच्या प्रमाणातही वाढ होत आहे. हे लोक नेमके कोण आहेत, कुठून आले आहेत, यात कोणी बांगलादेशी आहेत का, याची तपासणी करण्याची गरजही परिसरातील रहिवाशांनी व्यक्त केली.

# नियोजित नाट्यगृहाजवळ घाणीचे साम्राज्य

## नागरिकांना दुर्गंधीचा त्रास

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

ऐरोलीतील नागरिकांनी नवी मुंबई महापालिकेकडे शहरात नाट्यगृहाची मागणी केली होती. आजी माजी आमदार माजी नगरसेवक यांच्या प्रयत्नामुळे ऐरोलीतील माऊली संकुलाजवळील जागा नाट्यगृहासाठी उपलब्ध करून घेतली. आता या नाट्यगृह्याच्या उभारणीचे काम सुरू आहे, मात्र या नियोजित नाट्यगृहा बाहेरील रस्त्याच्या कडेला कचऱ्याचे व डेब्रिजचे ढीग असल्यामुळे नागरिकांना दुर्गंधीचा त्रास होत आहे



या ठिकाणी रात्रीच्या वेळेस अनधिकृतपणे फेरीवाले आपले व्यवसाय करत असल्याने शिल्लक व सडलेला भाजीपाला व कचरा या ठिकाणी टाकून देत असतात, मात्र जी विभाग पालिका कार्यालयातील संबंधित अधिकारी याकडे दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप येथील नागरिकांनी केला आहे. माऊली संकूलातील व्यावसायिकांनी सांगितले की, आम्ही सिडको कडून भूखंड घेऊन हे संकुल उभे केले आहे, मात्र गेल्या अनेक वर्षापासून आमच्या संकुलाला फेरीवाल्यांनी विळखा घातला असून हे फेरीवाले नियोजित नाट्यगृहाजवळ असलेल्या नाल्याजवळ व मोकळ्या जागेवर तसेच माऊली संकुलाजवळ शिल्लक राहिलेला व सडलेला भाजीपाला उघड्यावर टाकून देत असल्याने आम्हाला दुर्गंधी व डासाचा खूप त्रास सहन करावा लागतो.

या बाबतजी तक्रार देऊनही कारवाई होत नसल्याने याकडे मनपा प्रशासनाने लक्ष देऊन समस्या मार्गी लावण्याची मागणी होत आहे.

# काळसेकर टेक्निकल कॅम्पसमध्ये वाचन संकल्प महाराष्ट्र उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अनजुमन-इ-इस्लाम काळसेकर टेक्निकल कॅम्पस केंद्रीय वाचनालयाने वाचन संकल्प महाराष्ट्र २०२५ या उपक्रमाचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड वाढवणे आणि ग्रंथप्रेम विकसित करणे होता.



यामध्ये ग्रंथप्रदर्शन, पुस्तक पुनरावलोकन स्पर्धा, लेखक संवाद, ई-क्विझ, समूह वाचन, वाचन प्रेरणा सत्रे आणि डिजिटल ग्रंथसंपदा ओळख सत्रे यांसारखे विविध उपक्रम घेतले गेले. विशेषतः पुस्तक पुनरावलोकन स्पर्धा विद्यार्थ्यांच्या मोठ्या प्रतिसादामुळे आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरली. या स्पर्धेत २५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला, त्यापैकी १६ विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट पुनरावलोकन सादर केले. स्पर्धेतील विजेत्यांची नावे जाहीर झाली असून २६ जानेवारी, प्रजासत्ताक दिनी त्यांचा सन्मान करण्यात येणार आहे.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ए. आय. के. टी. सी. केंद्रीय वाचनालय आणि एन. एस. एस. युनिट (डए३१ व डए३२) यांनी विशेष प्रयत्न केले. विद्यार्थ्यांसह प्राध्यापक आणि ग्रंथप्रेमींनीही याला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

अंजुमन-इ-इस्लामचे अध्यक्ष पद्मश्री डॉ. झहीर आय काझी, नवी मुंबई संस्थेच्या मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष बुरहान हरीस, कॅम्पस डायरेक्टर डॉ. रमजान खाटिक, स्कूल ऑफ अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान चे डीन डॉ. राजेंद्र मगर आणि स्कूल ऑफ फार्मसीचे डीन डॉ. शारिक सय्यद, स्कूल ऑफ आर्किटेक्चरचे डीन प्रा.राज म्हात्रे, सर्व एचओडी, केंद्रीय वाचनालयाच्या प्रमुख शाहीन अन्सारी आणि विद्यार्थी परिषद यांनी मोलाची भूमिका बजावली.

# आदई येथे ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सप्ताह

**पनवेल : वार्ताहर**

आदई येथे गेल्या ४६ वर्षांपासून सुरु असलेल्या ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे पारायणाचे आयोजन करण्यात येत आहे. यंदाचे हे ४७ वे वर्ष असून अतिशय भक्तीभावाने हे पारायण सुरू आहे. रविवार (दि.२)पासून यास प्रारंभ झाला असून रविवारी (दि.९) या कार्यक्रमाची सांगता होणार आहे.



या निमित्त प्रवचन, किर्तन, हरिपाठ, ज्ञानेश्वरीचे पारायण असे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. आदई येथील भगवान गोपाळकृष्ण मंदिर आदई येथे भव्य दिव्य अशा स्वरुपाचे आयोजन करण्यात आले असून परिसरातील भाविक या ठिकाणी दर्शनासाठी गर्दी करत आहेत.

बुधवारी ह.भ.प श्री शाम महाराज शेळके यांचे प्रवचन सायं. ४ ते ५ तर सायंकाळी ५ ते६ दरम्यान गणेश हरिपाठ महिला मंडळ मोहोचा हरिपाठ, तर रात्री ७ ते ९ दरम्यान ज्ञानेश्वर तुळशीदास नामदास महाराज यांचे सुश्राव्य असे हरिकिर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवारी सायं. ४ ते ५ दरम्यान ह.भ.प. शेख बाबा महाराज यांचे प्रवचन, सायं ५ ते ६ दरम्यान श्री माऊलीकृपा महिला हरिपाठ मंडळ, उमरोली यांचा हरिपाठ, रात्री ७ ते ९ ह.भ.प.श्री. पुंडलिक महाराज मोरे यांचे हरि किर्तन, शुक्रवारी ह.भ.प. श्री. कृष्णा महाराज पाटील यांचे प्रवचन, सायं ५ ते ६ श्री हनुमान प्रासादिक महिला हरिपाठ सादर करणार आहेत. तर सकाळी १० ते १२ दरम्यान ह.भ.प. श्री. विक्रांत महाराज पोंडेकर व ह.भ.प.श्री. पांडुरंग महाराज गिरीकर यांचे हरि किर्तन होणार आहे. शनिवारी सायं. ४ ते ५ दरम्यान ह.भ.प. श्री. बामा महाराज भोपी यांचे प्रवचन, सायं. ५ ते ६ जय योगेश्वर महिला मंडळाचा हरिपाठ तर रात्री ७ ते ९ दरम्यान ह.भ.प. श्री. जयेश महाराज पोंडेकर यांचे हरिकिर्तन होणार आहे.

**रविवारी सांगता**

रविवारी पारायणाची सांगता होणार असून या निमित्त सकाळी १० ते १२ च्या दरम्यान ह.भ.प. योगीराज महाराज गोसावी (पैठण) यांचे काल्याचे किर्तन होणार आहे. या कार्यक्रमांचा लाभ घेण्याचे आवाहन ग्रामस्थ मंडळ यांचे सप्ताह समिती वारकरी सांप्रदाय मंडळ यांनी केले आहे.

# गारव्यामुळे मासळीची आवक घटली; दरात वाढ

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

गेल्या महिन्याभरापासून वातावरणातील गारठा वाढल्याने ताज्या मासळीची आवक घटली आहे. परिणामी, मासळीचे भाव देखील वाढले आहेत.



नवी मुंबईतील खाडी किनारी मिळणारी मासळी ही वातावरणातील गारठ्या मुळे कमी प्रमाणात मिळु लागली आहे. वातावरणातील बदलाचा फटका हा समुद्रातील मासळीच्या विविध प्रजातीला बसला जातो. त्यात गारठा वाढला की, समुद्रातील तापमानही कमी होते, त्यामुळे खोल समुद्रातील मासळीही गारठल्याने ती तळाला गेली आहे. त्यामुळे मासळीची ४० टक्केपेक्षा अधिक आवक घटली आहे. परिणामी मासळीच्या दरातही वाढ होऊ लागली आहे. त्यामुळे खवय्यांबरोबर मच्छीमारही आर्थिक संकटात सापडले आहेत.

नवी मुंबईतील बहुतांश मच्छिमार हे मुंबई येथील भाऊचा धक्का व कुलाबा येथून ताजी मासळी खरेदी करतात, मात्र त्या मासळीची देखील आवक कमी झाल्याने त्यांनादेखील भाव वाढीचा फटका बसला आहे. एकीकडे गारठा वाढला तर दुसरीकडे वाढते प्रदूषण याचा सगळा फटका मासळीच्या आवक वर होतो. त्यामुळे कमी मासळी मिळत असल्याने त्यांचे दर ही वाढीव झाले आहेत. दिवाळे खाडीपासून ते ऐरोली खाडीपर्यंत स्थानिक मच्छिमार मासेमारी करतात.

या खाडीतून मासे, निवढी, बोईस, कोलंबी तसेच चिवणी मिळतात पण गारठा वाढल्याने त्यांचीदेखील आवक खूपच कमी झाली आहे. त्यामुळे मच्छिमार बांधवांची दिवसभराची मेहनत वाया जात असल्याने त्यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

दरवर्षी प्रत्येक बदलत्या वातावरणाचा मासेमारी व्यवसायावर परिणाम होतो. त्यानुसार सध्या वातावरणातील गारव्यामुळे उष्णतेच्या शोधात मासे समुद्राच्या तळाला जाऊ लागले आहेत. त्यामुळे मासेमारीसाठी गेलेल्या बोटींना आवश्यक त्या प्रमाणात मासळी मिळत नसल्याने कधी कधी रिकाम्या हाती परतावे लागते. उन्ह वाढले की जाळ्यात मासोळी सापडली जाते. समुद्रातील वाढते प्रदूषण आणि बदलत्या वातावरणामुळे अनेक प्रकारचे मासे गायब होऊ लागले आहेत. पापलेट, सुरमई, घोळ आणि इतर अनेक प्रजातीचे मासे मिळेनासे झाले आहेत.

मांदेली आणि बोंबील, बांगडे हे सर्वसामान्य खवय्यांच्या पसंतीचे व परवडणारे मासेही महाग झाले आहेत. त्याचा परिणाम मासळीच्या दरवाढीवर झाला आहे.काहींना काही कारणाने मासेमारी संकटात येते. कधी समुद्रात घोगावणारे वादळ, प्रदूषण तर कधी बदलते वातावरण अशा विविध कारणाने मासळीच्या आवक वर परिणाम होत आहे.

**सध्याचे दर**

| | |
|---|---|
| सुरमई | ११०० रु. किलो |
| पॉपलेट | १००० रु. किलो |
| काफरी पॉपलेट | १५०० रु. किलो |
| किलो कोळंबी | ७०० रु. किलो |
| किलो घोळ | १३०० रु. किलो |
| जिताडा | १२०० रु. किलो |
| हलवा | ९५० रु. किलो |

> **नवी मुंबईतील घातक रासायनिक सांडपाणी खाडीद्वारे समुद्रात सोडले जाते. त्यामुळे होत असलेल्या प्रदूषणामुळे मासे कमी मिळत आहेत. त्यात वातावरणातील गारठ्यामुळे उष्णतेच्या शोधात मासे समुद्राच्या तळाला जाऊ लागले आहेत. परिणामी मासळीची आवक घटली असून दर वाढले आहेत. त्यामुळे मच्छीमारही आर्थिक संकटात सापडले आहेत.**
> **-सुरेखा कोळी,**
> **मासे विक्रेती, दिवाळे**

# खारघरच्या सरस्वती कॉलेजमध्ये चर्चासत्र

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये, महाविद्यालयामध्ये 'पर्यावरण तास' हा उपक्रम पनवेल महापालिकेच्या वतीने राबविण्यात येत आहे. या अंतर्गत आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवारी (दि.४) सरस्वती कॉलेज ऑफ इंजिनिअरींग खारघर येथे महापालिकेच्या वतीने चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले.



माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत पर्यावरणाचे महत्व शालेय विद्यार्थ्यांना समजावे यासाठी पर्यावरण तास हा उपक्रम उपायुक्त डॉ.वैभव विधाते यांच्या सूचनेनूसार महापालिका कार्यक्षेत्रातील महाविद्यालामध्ये, विद्यालयांमध्ये राबविण्यात येत आहे. या अंतर्गत आकाश, जल, वायू, भूमी, अग्नि या माझी वसुंधरा अभियानातील महत्वाच्या घटकांनूसार कृती कार्यक्रम, शिबिरे, व्याख्याने, वक्तृत्व स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, वृक्षारोपण, प्रश्नमंजूषा, चर्चासत्र, विविध खेळांचे आयोजन करण्यात येत आहेत.

सरस्वती कॉलेज ऑफ इंजिनिअरींग खारघर येथे पर्यावरण समस्यांवर तंत्रज्ञानाची भूमिका, पर्यावरण संरक्षणात वैयक्तिक आणि सामूहिक जबाबदारी व पाणी संवर्धन: शाश्वत भविष्यसाठी उपाययोजना या विषयांवरती गट चर्चेचे आयोजन करण्यात आले होते.

विद्यार्थ्यांनी या गट चर्चेमध्ये उत्स्फुर्तपणे सहभाग घेतला. तसेच या वेळी विद्यार्थ्यांनी माझी वसुंधराची शपथ घेतली. या वेळी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. मंजूषा देशमुख, प्राध्यापक डॉ. सुनिता पाल, प्राध्यापक सीमा सिंह यांचे सहकार्य लाभले.

**क्लिक...क्लिक...!**



(छाया : सुधीर नाझरे)

मुरुड : खोरा बंदरात जंजिरा किल्ल्यात जाण्यासाठी नुतन जेटी बनवण्यात आली. तपासणीसाठी प्रवासी बोटी जेटीला लावण्यात आल्या, परंतु समुद्राचा प्रवाह जुळत बसल्याने बोठी जेटीवर लावताना खूप त्रास होतो असे बोट धारकांचे म्हणणे आहे. जेठी चुकीची बांधण्यात आली आहे, अशी तक्रार आहे.

# नवीन कायदे व सायबर जनजागृती



**पनवेल : वार्ताहर**

शासनामार्फत करण्यात आलेल्या नवीन कायदे संदर्भात त्याचप्रमाणे सायबर गुन्हेगारी संदर्भात जनजागृती अभियानाचा स्तुत्य उपक्रम पनवेल शहर पोलिसांच्यामार्फत शहरातील व्हि.के.हायस्कूल येथे राबविण्यात आला. हा उपक्रम पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला.

**पनवेल शहर पोलिसांचा उपक्रम**

या वेळी मार्गदर्शक म्हणून ॲड.सचिन पटेल यांनी नवीन कायद्यांविषयी मार्गदर्शन केले. तसेच पनवेल शहर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक अभिजीत अभंग यांनी पोलीस जनता समन्वयक म्हणून काम पाहिले. तसेच पोलीस उपनिरीक्षक अभय कदम यांनी सायबर गुन्हे संदर्भात मार्गदर्शन केले. पोलीस उपनिरीक्षक अंकुश शेलार यांनी अंमली पदार्थ दुष्पपरिणाम या संदर्भात मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे महिला पोलीस उपनिरीक्षक प्रियांका शिंदे यांनी महिलांविषयी गुन्हे संदर्भात मार्गदर्शन केले.

कार्यक्रमादरम्यान उपस्थित विद्यार्थी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांना नवीन कायदा, सायबर फ्रॉड, अमली पदार्थांचे दुष्परिणाम, महिलांविषयी कायदे व नवी मुंबई व्हाट्सअप चैनल बाबत मार्गदर्शन करण्यात आले.

# रायगड जिल्ह्यातील धरणक्षेत्रात मुबलक साठा

## रायगड जिल्ह्यातील २८ धरण क्षेत्रात ८०.१० टक्के पाणीसाठा उपलब्ध

**रोहे : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील धरण क्षेत्रात मुबलक पाणीपुरवठा असून रायगड जिल्ह्यातील २८ धरण क्षेत्रात ८० टक्के पेक्षा जास्त पाणीसाठा उपलब्ध आहे. फेब्रुवारी महिना चालू झाला असून मार्च, एप्रिल, मे हे तीन महिने उन्हाळ्याचे असतात. पुढील चार महिन्यांसाठी हा पाणीसाठा उपयोगात येणार आहे.

रायगड जिल्ह्यातील २८ धरण क्षेत्रातील पाणीसाठा पाहता मुरुड तालुक्यातील फणसाड धरणक्षेत्रात ८८ टक्के पाणी साठा उपलब्ध, तळा तालुक्यातील वावा धरणक्षेत्रात ९२ टक्के पाणी साठा उपलब्ध, रोहा तालुक्यातील सुतारवाडी धरणक्षेत्रात ९६ टक्के पाणी साठा उपलब्ध, पेण तालुक्यातील आंबेघर धरणक्षेत्रात ९१ टक्के पाणी साठा उपलब्ध, अलिबाग तालुक्यातील श्रीगाव धरणक्षेत्रात ८३ टक्के पाणी साठा उपलब्ध, सुधागड तालुक्यातील कोंडगाव धरणक्षेत्रात ८३ टक्के पाणी साठा उपलब्ध, घोटवडे धरणक्षेत्रात ८० टक्के पाणी साठा उपलब्ध, ढोकशेत धरणक्षेत्रात ८२ टक्के पाणी साठा उपलब्ध, कवेळे धरणक्षेत्रात ७७ टक्के पाणी साठा उपलब्ध आहे

दक्षिण रायगड मध्ये उन्हेरे धरणक्षेत्रात ८१ टक्के पाणी साठा उपलब्ध, श्रीवर्धन तालुक्यातील कार्ले धरणक्षेत्रात ७४ टक्के पाणी साठा उपलब्ध, कुडकी धरणक्षेत्रात ८३ टक्के पाणी साठा उपलब्ध, रानीवली धरणक्षेत्रात ४८ टक्के पाणी साठा उपलब्ध, म्हसळा तालुक्यातील पाभरे धरणक्षेत्रात १०० टक्के पाणी साठा उपलब्ध, संदेरी धरणक्षेत्रात ९५ टक्के पाणी साठा उपलब्ध, महाड तालुक्यातील वरंध धरणक्षेत्रात ५६ टक्के पाणी साठा उपलब्ध आहे

खिंडवाडी धरणक्षेत्रात ८४ टक्के पाणी साठा उपलब्ध, कोथुर्डे धरणक्षेत्रात ८३ टक्के पाणी साठा उपलब्ध, खैरे धरणक्षेत्रात ६८ टक्के पाणी साठा उपलब्ध, कर्जत तालुक्यातील साळोख धरणक्षेत्रात ६१ टक्के पाणी साठा उपलब्ध, अवसरे धरणक्षेत्रात ६६ टक्के पाणी साठा उपलब्ध, खालापुर तालुक्यातील भिलवले धरणक्षेत्रात ९४ टक्के पाणी साठा उपलब्ध, कलोते मोकाशी धरणक्षेत्रात ९१ टक्के पाणी साठा उपलब्ध, डोणवत धरणक्षेत्रात ७६ टक्के पाणी साठा उपलब्ध, पनवेल तालुक्यातील मोरबे धरणक्षेत्रात ८४ टक्के पाणी साठा उपलब्ध, बामणोली धरणक्षेत्रात ७८ टक्के पाणी साठा उपलब्ध, उसरण धरणक्षेत्रात ७८ टक्के पाणी साठा उपलब्ध, उरण तालुक्यातील पुनाडे धरणक्षेत्रात ७१ टक्के पाणी साठा उपलब्ध आहे.



वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी राम प्रहर

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, मौजे आष्टे, ता. पनवेल, जि, रायगड येथील खालीलप्रमाणे वर्णन केलेल्या मिळकतीचे सर्व हक्क आमच्या अशिलांनी कायमस्वरूपी खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकत वर्णन व विदयमान कब्जेदारांची नावे खालीलप्रमाणे:-

**मौजे आष्टे, ता. पनवेल, जि, रायगड.**

| भोगवटादाराचे नाव/हिस्सेदार | गट/सव्हे भूमापन.नं. | हिस्सा/उपविभाग नं. | क्षेत्र हे-आर.चौ.मी. | आकार रु पैसे |
|---|---|---|---|---|
| सहयाद्री को. ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी. लि. आष्टे | १५७/७ | बिन शेती | ३-४३-०० | ३४.३० |
| | | पो. ख. | ०-००-०० | |
| | | एकुण | ३-४३-०० | |
| सहयाद्री को. ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी. लि. आष्टे | १५७/१५ | बिन शेती | ३-०६-०० | ३०.६० |
| | | पो. ख. | ०-००-०० | |
| | | एकुण | ३-०६-०० | |
| सहयाद्री को. ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी. लि. आष्टे | १५७/२२ | बिन शेती | ४-५५-०० | ४५.५० |
| | | पो. ख. | ०-००-०० | |
| | | एकुण | ४-५५-०० | |
| सहयाद्री को. ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी. लि. आष्टे | १५७/२३ | बिन शेती | २-८८-०० | २८.८० |
| | | पो. ख. | ०-००-०० | |
| | | एकुण | २-८८-०० | |
| सहयाद्री को. ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी. लि. आष्टे | १५७/२४ | बिन शेती | २-८८-०० | २८.८० |
| | | पो. ख. | ०-००-०० | |
| | | एकुण | २-८८-०० | |
| सहयाद्री को. ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी. लि. आष्टे | १५७/३० | बिन शेती | ४-२४-०० | ४२.४० |
| | | पो. ख. | ०-००-०० | |
| | | एकुण | ४-२४-०० | |
| सहयाद्री को. ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी. लि. आष्टे | १५७/३१ | बिन शेती | ३-९१-०० | ३९.१० |
| | | पो. ख. | ०-००-०० | |
| | | एकुण | ३-९१-०० | |
| सहयाद्री को. ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी. लि. आष्टे | १५७/३५ | बिन शेती | ५-२७-०० | ५२.० |
| | | पो. ख. | ०-००-०० | |
| | | एकुण | ५-२७-०० | |
| सहयाद्री को. ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी. लि. आष्टे | १५७/४२ | बिन शेती | ३-२२-०० | ३२.२० |
| | | पो. ख. | ०-०-०० | |
| | | एकुण | ३-२२-०० | |
| अमिशा उदय वाठोडकर वर्षा उदय वाठोडकर | १५७/२० | बिन शेती | ४-८६-०० | ४८.६० |
| | | पो. ख. | ०-००-०० | |
| | | एकुण | ४-८६-०० | |

**वरील संपूर्ण क्षेत्राचा कायम स्वरूपी विक्री व हस्तांतरणाचा व्यवहार**

वरील वर्णन केलेल्या मिळकतीचे सर्व हक्क आमचे अशिलांनी कायमस्वरूपी खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे ठरविले आहे.

वरील मिळकतीबाबत अन्य कोणाचाही दान, गहाण, बोजा, बक्षिस, साठेकरार, विकसनकरार, फरोक्त, ट्रस्टी, पोटगी, वारसा भाडेपट्टा, वहिवाट व तत्सम कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासाहित सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ (सात) दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे पाठवाव्यात.

वरील मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहित आहे, असे समजण्यात येऊन सदरहू मिळकती संदर्भात आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. सदर दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची स्पष्ट नोंद घ्यावी.

**पनवेल,**
**दि. - ०५/०२/२०२५**

**सही/-**
**(निलम वैभव विभुते)**
**वकील.**
**पत्ता : ऑफिस नं. १३, यशोकिरण को. ऑप. हौसिंग सोसायटी, पहिला मजला, सावरकर चौकाजवळ, पनवेल ४१० २०६, जि. रायगड. फोन नं. ७२४९७७७७७७.**

### महाराष्ट्र शासन

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां. विभाग, पनवेल**
**पिनकोड-४१०२०६**
E-mail- panvel.ee@mahapwd.gov.in
दूरध्वनी क्रमांक ०२२-२७४५२७७८ फॅक्स - ०२२-२७४६७४४०

**ई-कार्यप्रणाली अंतर्गत ई-निविदा क्र. ८६ (ई-निविदा) सन २०२४-२५**

सार्वजनिक बांधकाम (सा.बां.) विभाग, पनवेल हे (दुरध्वनी क्र. ०२२- २७४५२७७८ फॅक्स-०२२-२७४६७४४०) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील नोंदणीकृत कंत्राटदाराला योग्य त्या कामांकरीता बी-१ नमुन्यातील निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागविणेत येत आहे. सदरची ऑनलाईन ई-निविदा सुचना www.mahapwd.com and www.mahatenders.gov.in पोर्टलवरती उपलब्ध आहे.

टिप- या निविदेमध्ये एकूण १ काम समाविष्ठ असुन ऑनलाईन निविदा विक्री व बीड प्रिपरेशन दिनांक ०५/०२/२०२५ सकाळी १०.०० ते दिनांक १९/०२/२०२५ रोजी सायंकाळी १८.०० पर्यंत संकेत स्थळावर उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. www.mahatenders.gov.in

**ई-निविदा जा.क्र./सा.बां./पनवेल/**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**सा.बां. विभाग, पनवेल, जि. रायगड**
**दिनांक : ०५/०२/२०२५**

**सही/-**
**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**पनवेल**

### अशासकीय वाहनचालक नियुक्तीकरिता उमेदवांना आवाहन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयातील बाह्ययंत्रणेद्वारे माजी सैनिक संवर्गातून बहुउद्देशीय स्वरूपाचे (र्चीश्रींळींरीइळपस) अशासकीय वाहन चालक नियुक्ती करावयाची असल्याने जिल्ह्यातील इच्छूक माजी सैनिक उमेदवारांनी २८ फेब्रुवारी २०२५ पर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, रायगड-अलिबाग (निवृत) ले.कर्नल राहुल वैजनाथ माने यांनी केले आहे.

माजी सैनिक उमेदवाराचे शिक्षण इयत्ता दहावी पास अथवा सैन्यदलाकडून समकक्ष प्रमाणपत्र असावे. भारतीय सेनेमध्ये कमीतकमी १५ वर्षे सेवा झालेली असावी . याकरिता आधार कार्ड, पॅन कार्ड, सैन्यसेवा पुस्तकाची छायांकित प्रत, माजी सैनिक ओळखपत्र,फोटो, बँक पासबुक छायांकित प्रत ही कागदपत्रे अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

### पनवेल महानगरपालिका

**जाहीर नोटीस सूचना**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, पनवेल महानगरपालिका. | ०२ रॉयल पाम, ०१ जांभूळ, ०२ पिंपळ अशी एकूण ०५ झाडे तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील नाडकर्णी हॉस्पीटल ते प्रिन्स पॅराडाईस को. हौ. सोसायटी पर्यंत रस्त्याचे व गटार बांधकाम करणेस बाधित होत आहेत. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. मूदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**जा.क्र.पमपा/ जनसंपर्क/३१२५/प्र.क्र. ५४/५४/२०२५**
**दिनांक :- ०५/०२/२०२५**

**सही/-**
**उपायुक्त**
**पनवेल महानगरपालिका**

### कत्तलीसाठी जनावरे नेणाऱ्या वाहतूकीवर कारवाई

**खोपोली : प्रतिनिधी**

बैल दाटीवाटीने गाडीमध्ये भरून कत्तल करण्यासाठी नेत असताना गोरक्षकानी पोलिसांच्या लक्षात आणून दिल्याने लक्ष्मण मरगळे (रा.कामाली ता.पेण) याला पिकअप गाडीसह पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

मंगळवारी सकाळी साडेअकरा वाजण्याच्या सुमारास खोपोली पेण मार्गावर वडवळ टोलनाक्या पासून दोन किमी अंतरावर पिकअप गाडीत दोन गोवंशीय जातीचे बैल दाटीवाटीने भरून गाडीमध्ये गुरांचे चारा पाण्याची व पुरेशी हवा येईल, अशी कोणत्याही प्रकारे सोय न करता कोणाला समजू नये याकरीता गाडी बंदोबस्त करुन वाहतूक करण्यात येत होती.

गोवंशीय जनावरे ही कत्तल करण्यासाठी वाहतूक करीत असतांना मिळून आल्याने याबाबत खालापूर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला. अधिक तपास सहाय्यक फौजदार एस सांगळे हे करीत आहे.




### पेण नगरपरिषद, पेण

**जाहीर निविदा सूचना**
सन २०२४-२०२५

पेण नगरपरिषद, पेण जि-रायगड यांजकडून खालील कामांसाठी अनुभवी व इच्छुक व्यक्ती/संस्था/कंपनी यांचेकडून फेर निविदा / दरपत्रक मागविणेत येत आहेत.

| अनु. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा फार्म रक्कम | इसारा रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | नगरपरिषद आंबेगाव क्षेपणभूमी येथे पाण्याची टाकी बसविणे व पाईप लाईन दुरुस्त करणेबाबत | रु.४०,०००/- | रु.५०/- | रु.५००/- |
| २ | नगरपरिषद वाहन क्र. MH ०६ BW ५३०३ (रुग्णवाहिका) चे AC व ऑक्सिजन लाईन दुरुस्त करणेबाबत. | रु.२५,०००/- | रु.५०/- | रु.५००/- |

**कामाबाबत अटी व शर्ती :**

१. निविदा विक्री कालावधी दिनांक- ०६/०२/२०२५ ते दिनांक-१४/०२/२०२५ रोजी सायंकाळी- ५.०० वाजेपर्यंत कार्यलयात (सुटीचे दिवस वगळता) मिळू शकतील.
२. निविदा जमा करण्याचा कालावधी दिनाक-१७/०२/२०२५ रोजी साय. ५.०० वाजेपर्यंत
३. निविदा उघडण्याचा कालावधी दिनाक १८/०२/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता अथवा प्रशासकीय सोयीनुसार.
४. या बाबतची अधिक माहिती नगरपरिषदेचे आरोग्य विभाग कार्यालयीन वेळेत उपलब्ध होईल.

**सही/-**
**प्रशासक तथा मुख्याधिकारी**
पेण नगरपरिषद,पेण

### E-TENDER NOTICE

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender** specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| Tender -30 **(7000032946)** | RFx e-tender for AMC for various regular preventative maintenance / emergency and breakdown works of various 220KV & 100KV Substations under EHV O&M Division Panvel….**3rd call.** | **Limited to Rs.25,00,000/-** (Tender Fee Rs. 500/- + 18% GST) |
| ender -31 **(7000034745)** | RFx e-tender for work of providing & fixing of 1.1kV XLPE 3.5 core 120 sqmm XLPE power cable at 220kV Apta Substation under EHV(O&M)Dn. Panvel…**3rd call** | **Rs.5,17,945/-** (Tender Fee Rs. 500/- + 18% GST) |
| Tender -32 **(7000033093)** | RFx e-tender for work of replacement of existing Earth wire at 220kV Apta, Bombay Dyeing and 100kV Patalganga Substation under EHV (O&M) Dn. Panvel…**3rd call.** | **Rs.19,20,318/** (Tender Fee Rs. 500/- + 18% GST) |
| Tender -33 **(7000033584)** | RFx E-tender for work of P/F of Number plate, circuit plate, phase plate, danger board and name plate to the towers of old 100kV Apta - Jite - Thal - TSS, 220kV Apta-Bombay Dyeing-Sahara, 100kV Apta Khopoli Bhokarpada 100kV Apta - MUSCO I & II, 220kV Apta - Uran - 1,2,3,4, 100kV Apta - Patalganga - Reliance, D/C lines under EHV Lines S/Dn Panvel under EHV (O&M) Division Panvel..**3rd call** | **Rs.24,94,751/** (Tender Fee Rs. 500/- + 18% GST) |
| Tender -34 **(7000033586)** | RFx E-tender for work of strength evaluation survey (Structural Stability) of existing foundation & tower members of 220kV Apta – Taloja – Kalwa D/C line & 220kV ONGC – KGaon-Topworth Khandeshwar D/C line under EHV Lines Maint Sdn Panvel under EHV (O&M) Division Panvel. (**RFx No - 7000033586)…3rd call** | **Rs.20,35,264/** (Tender Fee Rs. 500/- + 18% GST) |

EMD 1% of estimated cost for each Tender., **Submission of bids from 05.02.2025 to 17.02.2025 up to 10:59 hrs,Bid Opening date:-17.02.2025 @ 11:00 Hrs for all tender.** For further details visit our website https://srmetender.mahatransco.in/ Contact Person: The Add. Executive Engineer (O) Mob. No.9769213818, E-mail ID ee7210@mahatransco.in

**SD/-**
**EXECUTIVE ENGINEER**
**EHV(O&M) DN PANVEL**

### महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग माणगाव

**ई-निविदा सुचना क्र. १२ सन २०२४-२५**

कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, विभाग, माणगाव यांचेकडून खालील कामाकरिता ई-निविदा सुचना मागविण्यात येत आहे **जल जीवन मिशन अंतर्गत उमटे प्रादेशीक पाणी पुरवठा योजना ता. अलिबाग जि. रायगड** अस्तित्वातील उमटे धरणाची दुरुस्ती करणे व धरणातील गाळ काढणे इत्यादी कामाची अंदाजित किंमत **रु. ८,८१,३५,६३१/-**

कामासंबंधीचा सविस्तर तपशील दि. ६/०२/२०२५ पासून **www.mahatenders.gov.in** या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

दि. ३१/०१/२०२५

**सही/-**
**एच.आर.नागदे**
**कार्यकारी अभियंता**
**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण**
**विभाग माणगाव**

**JANARDAN BHAGAT SHIKSHAN PRASARAK SANSTHA'S**

### RAMSHETH THAKUR COLLEGE OF COMMERCE AND SCIENCE, KHARGHAR, NAVI MUMBAI

**Accredited 'A' Grade by NAAC with CGPA 3.04**
Plot No.-01, Sector-33, Kharghar, Navi Mumbai, Dist.-Raigad 410210

**APPLICATIONS ARE INVITED FOR THE POST OF PRINCIPAL**
FROM THE ACADEMIC YEAR 2024-25
**UN-AIDED**

The above post is open to all, however candidates from any category can apply for the post.

Reservation for women will be as per **University Circular No. BCC/16/74/1998 10th March, 1998. 4% reservation shall be for the persons with disability as per University Circular No. Special Cell/ICC/2019-20/05 dated 05th July, 2019.**

Candidates having knowledge of Marathi will be preferred.

**"Qualification, Pay Scales and other requirement are as prescribed by the UGC Notification dated 18th July, 2018, Government of Maharashtra Resolution No. Misc-2018/ C.R.56/ 18/UNI-1, dated 8th March, 2019 and University Circular No. TAAS/(CT)/ICD/2018-19/1241, dated 26th March, 2019 and revised from time to time." The Government Resolution & Circular are available on the website mu.ac.in**

Applicants who are already employed must send their application through proper channel. Applicants are requested to account for breaks, if any in their academic career.

Application with full details should reach the **CHAIRMAN, Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha's Changu Kana Thakur Arts, Commerce & Science College, New Panvel (Autonomous), Plot No.-01, Sector-11, Khanda Colony, New Panvel (W), Dist.-Raigad 410206 within 21 days** from the date of publication of this advertisement.

In case of any query please contact –
**MR. PRALHAD THAKUR – Contact No. – 9022600288**
**This is University approved advertisement.**

**Shri. Ramsheth Thakur (Ex. M.P.)**
Chairman, Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha, Panvel

**JANARDAN BHAGAT SHIKSHAN PRASARAK SANSTHA'S**

### BHAGUBAI CHANGU THAKUR COLLEGE OF LAW, NEW PANVEL

**Accredited 'B+' Grade by NAAC with CGPA 2.69**
Plot No.-04, Sector-11, Khanda Colony, New Panvel (W), Dist.-Raigad 410206

**APPLICATIONS ARE INVITED FOR THE POST OF PRINCIPAL**
FROM THE ACADEMIC YEAR 2024-25
**UN-AIDED**

The above post is open to all, however candidates from any category can apply for the post.

Reservation for women will be as per **University Circular No. BCC/16/74/1998 10th March, 1998. 4% reservation shall be for the persons with disability as per University Circular No. Special Cell/ICC/2019-20/05 dated 05th July, 2019.**

Candidates having knowledge of Marathi will be preferred.

**"Qualification, Pay Scales and other requirement are as prescribed by the UGC Notification dated 18th July, 2018, Government of Maharashtra Resolution No. Misc-2018/ C.R.56/ 18/UNI-1, dated 8th March, 2019 and University Circular No. TAAS/(CT)/ICD/2018-19/1241, dated 26th March, 2019 and revised from time to time." The Government Resolution & Circular are available on the website mu.ac.in**

Applicants who are already employed must send their application through proper channel. Applicants are requested to account for breaks, if any in their academic career.

Application with full details should reach the **CHAIRMAN, Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha's Changu Kana Thakur Arts, Commerce & Science College, New Panvel (Autonomous), Plot No.-01, Sector-11, Khanda Colony, New Panvel (W), Dist.-Raigad 410206 within 21 days** from the date of publication of this advertisement.

In case of any query please contact –
**MR. PRALHAD THAKUR – Contact No. – 9022600288**
**This is University approved advertisement.**

**Shri. Ramsheth Thakur (Ex. M.P.)**
Chairman, Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha, Panvel

JANARDAN BHAGAT SHIKSHAN PRASARAK SANSTHA'S

### RAMSHETH THAKUR PUBLIC SCHOOL, ULWE

**U-Dise No- 27244100042. - Proposed CBSE School**
**Plot No.01, Sector-12, Ulwe, Tal-Panvel, Dist-Raigad -410 206.**
**Mob. : 7710090800 / 7710072762**

**STAFF RECRUITMENT**

**Applications are invited for the following posts for the Academic Year 2025-26 for immediate appointment.**

| POSTS | QUALIFICATIONS |
|---|---|
| Pre-Primary Teacher (3) | HSC/Graduate/Post graduate with atleast 50% marks and ECCED/PTC/ Montessori Course with minimum 2 years of experience in a CBSE school |
| PRT (5)<br>English - 1<br>Science - 1<br>Mathematics - 1<br>Marathi - 2 | Graduate/Post graduate in the subject with at least 50% marks, Bachelor of Education (B.Ed.) with teaching experience in a CBSE school Preferred CTET qualified teachers. Must have knowledge of working on computer. |
| Art Teacher - 1 | Graduate / Post Graduate with A.T.D. |
| Librarian ( 1) | B.Lib/ M.Lib |
| Only those candidates who have passed Std. X from an English medium School should apply for the teaching post. | |

**Note :** Interested candidate can send their resume with passport size photograph and self- attested copies of documents to Chairman JBSP Sanstha at, **Ramsheth Thakur Public School. Ulwe. Plot No.1, Sector-12, Ulwe, Tal: Panvel. Dist: Raigad.- 410206.**

Candidates may also submit the application by mail to **rtpsulwe@gmail.com** on or before the last **date 22/02/2025, (Saturday).**

For Additional Information Contact:

- **Mrs. Chashminder Bakshi – 7977498174.**
- **Mrs. Sonal S. Mokal - 7045299876**

**Shri. Ramsheth Thakur (Ex.M.P.)**
**Chairman, Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha, Panvel**

# अभिषेक शर्माची आयसीसी टी-२० क्रमवारीत मोठी झेप!

## ४० वरून थेट दुसऱ्या स्थानावर झेप



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

इंग्लंडविरुद्धच्या टी-२० मालिकेतील शेवटच्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात अभिषेक शर्माची बॅट जबरदस्त तळपली होती. त्याने १३५ धावांची ऐतिहासिक खेळी साकारत विक्रमांची रांग लावली होती. आता या खेळीच्या जोरावर अभिषेक शर्माला आयसीसी टी-२० क्रमवारीत मोठा फायदा झाला आहे. नुकत्याच जाहीर करण्यात आलेल्या क्रमवारीत त्याने मोठी झेप घेतली आहे. तो पहिल्या क्रमांकावर पोहोचला नसला तरी तो अव्वल स्थानाच्या अगदी जवळ आहे. त्यामुळे ट्रॅव्हिस हेडची चिंता वाढली आहे.

आयसीसीने यावेळी जाहीर केलेल्या नवीन टी-२० क्रमवारीत अभिषेक शर्माने मोठी झेप घेतली आहे. या वेळी तो ३८ स्थानांची झेप घेत दुसऱ्या क्रमांकावर पोहोचला आहे. अभिषेक शर्माचे हे सर्वकालीन उच्च क्रमवारी आहे. वास्तविक, त्याने प्रथमच टॉप १० मध्ये प्रवेश केला आहे. यासह तो दुसऱ्या क्रमांकावर पोहोचला आहे, परंतु पहिल्या क्रमांकावर अजूनही ट्रॅव्हिस हेडच आहे. सध्या हेडचे रेटिंग पॉइंट ८५५ आहेत. अभिषेक शर्माबद्दल बोलायचे, तर तो ८२९ रेटिंगसह नंबर दुसऱ्या क्रमांकावर आहे. अशा प्रकारे अभिषेकला ३८ स्थानांचता फायदा झाल्याने सर्व फलंदाजांना त्यांच्या स्थानावरून एका जागेवरून खाली यावे लागले आहे.

आयसीसी टी-२० क्रमवारीत सध्या भारताचा तिलक वर्मा एका स्थानाच्या घसरणीसह तिसऱ्या क्रमांकावर पोहोचला आहे. त्याचे रेटिंग पॉइंट ८०३ आहेत. इंग्लंडच्या फिल सॉल्टबद्दल बोलायचे, तर त्याला एक स्थान गमवावे लागले आहे, तो आता ७९८ च्या रेटिंग पॉइंटसह चौथ्या क्रमांकावर गेला आहे. भारताच्या सूर्यकुमार यादवलाही एक स्थानाचा फटका बसला आहे. आता तो ७३८ रेटिंगसह पाचव्या क्रमांकावर आहे.

या टॉप ५ फलंदाजांबद्दल बोलायचे झाले तर, इंग्लंडच्या जोस बटलरलाही एका स्थानाचा फटका बसला आहे. तो सध्या ७२९ रेटिंग पॉइंटसह सहाव्या क्रमांकावर आहे. पाकिस्तानचा बाबर आझम एका स्थानाने घसरून सातव्या क्रमांकावर आला आहे. त्याचे रेटिंग पॉइंट ७१२ आहेत. श्रीलंकेचा पथुम निसांका ७०७ रेटिंग पॉइंटसह आठव्या क्रमांकावर आहे. पाकिस्तानचा मोहम्मद रिझवान ७०४ रेटिंग पॉइंटसह नवव्या क्रमांकावर आहे. श्रीलंकेच्या कुसल परेराला मात्र आपले दहावे स्थान वाचवण्यात यश आले आहे. त्याचे रेटिंग पॉइंट सध्या ६७५ आहेत.

### राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धा

# मनमाड, नाशिकला होणार निवड चाचणी

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य कबड्डी असो.च्या मान्यतेने नाशिक जिल्हा कबड्डी असो. च्या विद्यमाने २३ ते २७ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत ३५व्या किशोर/किशोरी गट राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

मनमाड, नाशिक येथील श्री. गुरू गोविंद सिंह हायस्कूल शेजारील हॅलीपॅड मैदानावर मॅटच्या ४ क्रीडांगणावर हे सामने खेळविले जातील. सामने सकाळ व सायंकाळ या दोन्ही सत्रात खेळविले जातील. या स्पर्धेतून महाराष्ट्राचा किशोर व किशोरी गटाचा संघ निवडण्यात येईल. हा निवडण्यात आलेला संघ काश्मीर येथे होणाऱ्या किशोर/किशोरी गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व करेल.

स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सर्व जिल्हा संघाना सूचित करण्यात येते की त्यांनी आपले किशोरी (मुली) गटाचे संघ दिनांक २२फेब्रु. रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत स्पर्धेच्या ठिकाणी दाखल होतील याची दक्षता घ्यावी. त्याच दिवशी सर्व संघांची छाननी केली जाईल. २३ व २४ या दोन दिवसात साखळीती व उप उपांत्यपूर्व आणि उपांत्यपूर्व सामने खेळविले जातील तसेच किशोर (मुले) गट संघानी २४ फेब्रुवारी रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत आपली उपस्थिती राखावी. त्यांची छाननी त्याच दिवशी करण्यात येईल. मुलांचे सामने २५ व २६ या दोन दिवसांत खेळविण्यात येतील. दोन्ही गटाचे उपांत्य व अंतिम सामने २७ फेब्रुवारी रोजी सायंकाळच्या सत्रात खेळविण्यात येतील.

तीस वर्षांनंतर मनमाडला हे सामने पुन्हा होत आहेत. जय भवानी मंडळाच्या सहकार्याने १९९५ साली मनमाड येथे किशोर गटाचे सामने झाले होते. त्यानंतर मनमाडकरांना हा मान मिळाला आहे. सर्व खेळाडूंच्या निवासाची व्यवस्था गुरुद्वारामार्फत करण्यात आली आहे, अशी माहिती पत्रकाद्वारे राज्य कबड्डी असो.चे सचिव बाबुराव चांदेरे व स्पर्धा संयोजन समितीचे अध्यक्ष राजेंद्र पगारे यांनी दिली.

# कर्जतमध्ये आंतर महाविद्यालयीन कॅरम व बुद्धिबळ स्पर्धा उत्साहात



**कर्जत : प्रतिनिधी**

मुंबई विद्यापीठाच्या ए झोन आंतर महाविद्यालयीन कॅरम व बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन कर्जतमधील कोंकण ज्ञानपीठ राहुल धारकर फार्मसी महाविद्यालयामध्ये करण्यात आले होते. यामध्ये कोंकण ए झोनमधील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. कॅरम स्पर्धेत डोंबिवली येथील एस. एच. जोंधळे पॉलिटेक्निक महाविद्यालयाने प्रथम क्रमांक तर पेण येथील गव्हरमेंट पॉलिटेक्निक महाविद्यालयाने द्वितीय क्रमांक मिळवला. बुद्धिबळ स्पर्धेत पेण येथील गव्हरमेंट पॉलिटेक्निक महाविद्यालयाने प्रथम आणि रसायनी येथील पिल्ले महाविद्यालयाने द्वितीय क्रमांक पटकावला. एकूण सतरा महाविद्यालयातील विद्यार्थी खेळाडू या स्पर्धेत सहभागी झाले होते.

रायगड जिल्हा कॅरम संघटनेचे सचिव दीपक साळवी यांच्या हस्ते कॅरम व बुद्धिबळ स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. या वेळ खजिनदार वैभव पेठे, डॉ. अमोल चांदेकर, कर्जत तालुका बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष संजीव ठाकरे, राष्ट्रीय पंच अंकित जोशी, मुख्य पंच राजेश भुतकर, ओमकार जिनघरे, डॉ. निलोफर खान आदी उपस्थित होते. डॉ. चांदेकर यांनी उपस्थितांचे स्वागत करून प्रास्ताविक केले.

वैभव पेठे यांनी, मैदानी खेळांबरोबरच बैठे खेळ खेळनेही आवश्यक आहे, असे सूचित केले.

अंकित जोशी यांनी, बुद्धिबळ खेळणाऱ्या मुलांची एकाग्रता चांगली असते. शाळांमधून बुद्धिबळ खेळण्यासाठी मुलांना प्रोत्साहित करणे आवश्यक आहे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

राजेश भुतकर यांनी, एखाद्या स्पर्धेत जिंकण्याच्या इराद्याने नक्की जा पण स्पर्धेत सहभागी व्हा. असा सल्ला दिला. सूत्रसंचालन प्रा. प्रणिता भांगारे आणि प्रा. असिफा खान यांनी सूत्रसंचालन केले. आभार प्रा. पूजा मोधळे यांनी मानले.

या वेळी राजाभाऊ कोठारी, डॉ. प्रशांत सदावर्ते, प्रा. अनिकेत इंदुलकर, प्रा. स्वाती चुंबळे, प्रा. सिद्दीका धोपे, प्रा. पूजा डंगर, प्रा. श्वेता दांगट आदी उपस्थित होते.



# मास्टर प्रीमियर लीगमध्ये शौर्य लांगीची कामगिरी

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

कोकणातील क्रिकेट क्षेत्रात नवा ठसा उमठवण्यासाठी मास्टर क्रिकेट अकॅडमीने एक महत्वाची पुढाकार घेतली असून, दरवर्षी आयपीएल प्रमाणे आयोजित करण्यात आलेली 'मास्टर प्रीमियर लीग' (MPL) स्पर्धा या वर्षी चिपळूणमध्ये झाली. या स्पर्धेतील प्रमुख नायक ठरले ते शौर्य सुयोग लांगी, जो श्रीवर्धन तालुक्यातील श्रीक्षेत्र हरिहरेश्वर येथील निवासी माजी सरपंच सुयोग लांगी यांचा सुपुत्र आहे.

शौर्यने सलग तीन मॅचमध्ये 'मॅन ऑफ द मॅच'चे बहुमान पटकावत 'बेस्ट बॉलर' म्हणून सुद्धा आपली मदार ठरवली. त्याच्या उत्कृष्ट खेळामुळे त्याने सर्वांचं लक्ष वेधून घेतले आणि मास्टर प्रीमियर लीगच्या स्पर्धेत चिपळूणमध्ये विजय मिळवला.

शौर्यच्या या प्रचंड कामगिरीबद्दल मास्टर क्रिकेट अकॅडमीचे सर्वेसर्वा आकाश पवार आणि संपूर्ण टीमने त्याचे अभिनंदन केले. शौर्यला या वेळी चिपळूणचे सन्माननीय आमदार शेखर निकम यांनीसुद्धा शुभेच्छा दिल्या आणि त्याच्या आगामी क्रिकेट कारकिर्दीसाठी आशीर्वाद दिले.









# दिव्यांग क्रीडा महोत्सव सुरू



**नवी मुंबई : बातमीदार**

राष्ट्रीय बौद्धिक दिव्यांगजन सशक्तिकरण संस्था, प्रादेशिक केंद्र, नवी मुंबईच्या ४१ व्या क्रीड महोत्सवाचा उद्घाटन सोहळा खारघर, नवी मुंबई येथील संस्थेच्या प्रांगणात मंगळवारी (दि.४) झाला. या सोहळ्याचे उद्घाटन संस्थेचे संचालक डॉ. बी. वी. रामकुमार यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी संस्थेचे प्रभारी अधिकारी डॉ. रवी प्रकाश सिंग उपस्थित होते.

या क्रीडा महोत्सवामध्ये विविध क्रीडा स्पर्धा आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, विद्यार्थ्यांसह विविध मान्यवर आणि क्रीडाप्रेमींनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. संस्थेच्या वतीने आयोजित या स्पर्धांचे मुख्य उद्दिष्ट बौद्धिक दिव्यांग व्यक्तींमध्ये क्रीडा आणि शारीरिक सक्षमता विकसित करणे तसेच समाजामध्ये समावेशकतेला चालना देणे आहे.

या वेळी संस्थेचे संचालकांनी क्रीडामुळे मानसिक आणि शारीरिक आरोग्य सुधारते तसेच दिव्यांग व्यक्तींमध्ये आत्मविश्वास वाढतो, असे मत व्यक्त केले. या क्रीडा महोत्सवामध्ये प्रशिक्षणार्थी, बौद्धिक दिव्यांग विद्यार्थी, त्यांचे पालक आणि संस्थेचे कर्मचारी यासाठी विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. हा क्रीडा महोत्सव ४ फेब्रुवारी ते २० फेब्रुवारी या कालावधीत होणार आहे.






दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com